# प्रकरण तिसरे

## इतिहास विषयाचे महत्व, इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दती व अध्यापन कार्यनीती


३.१ प्रास्ताविक

३.२ इतिहास विषयाचे महत्व

३.३ इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दतींची गरज व इतिहास अध्यापनाच्या पध्दती

३.४ अध्यापन पध्दती व अध्यापन कार्यनीती यातील फरक

३.५ अध्यापन कार्यनीतींचे प्रकार

३.६ समारोप

## ३.१ प्रास्ताविक :

प्रकरण दोनमध्ये प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला आहे. या प्रकरणात संशोधन विषयाची पार्श्वभूमी म्हणून इतिहास विषयाचे महत्व, इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दती व अध्यापन कार्यनीती यामधील फरक आणि अध्यापन कार्यनीतींचे प्रकार यांचा आढावा घेतला आहे.

## ३.२ इतिहास विषयाचे महत्व :

इतिहास या शब्दाचा विग्रह इति+ह+अस् असा होतो. याचा अर्थ ' असे हे घडले ' असा लावण्यात येतो. या दृष्टीने भूतकाळात ज्या उल्लेखनीय व संस्मरणीय घटना व घडामोडी घडल्या त्यांचा सार्थत वृत्तांत म्हणजे इतिहास होय.

इतिहासाच्या अभ्यासाने वर्तमानाचा अन्वयार्थ लावता येतो व भविष्यातील गोष्टींचा वेध घेता येतो. या दृष्टीने इतिहास विषयाला महत्वाचे स्थान आहे. या संदर्भात प्रो. आर्थर मार्वीक आपल्या "The Nature of History" या ग्रंथात म्हणतात की, " इतिहास नसलेले लोक अथवा इतिहासाची जाण नसलेला समाज हा स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखा असतो." (गायकवाड, सरदेसाई, हनमाने,१९८१) इतिहासांचे ज्ञान नसेल तर त्याच समस्यांशी पुन्हा झगडावे लागते. त्याच चुका पुन:पुन्हा होतात. म्हणजेच अनुभवांच्या संग्रहातून जे सुख व समृध्दी मिळते ते तशा स्थितीत मिळत नाही.

हॅम्पोल्ड हा इतिहासकार म्हणतो," इतिहास हा अनुभवांचा नंदादीप आहे. " (पत्की श्री.मा., १९८०) पूर्वकालीन अनुभवांच्या प्रकाशात मानव समाजाने पुढील मार्ग आक्रमावा. पूर्वीचे अनुभव मनुष्यास मार्ग दाखवितात म्हणून

मौल्यवान वाटतात.

अमेरिकन इतिहासकार प्रो. नेव्हिन्स यांच्या मते " इतिहास म्हणजे भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा पूल आहे व तो भविष्य-काळाचा मार्गदर्शक आहे (गायकवाड,सरदेसाई, हनमाने, १९८१) नेव्हिन्सच्या मते इतिहास म्हणजे मानवाच्या हातातील कंदिल आहे व तो मानवाच्या प्रत्येक पावलावर प्रकाश टाकत असतो आणि भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील अंधार मदून काढण्याचे काम करतो व या प्रकाशाच्या अंधारावर मानवाला भविष्यकाळाची चाहूल घेता येते.

इतिहासाचे महत्व सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. हा सूर्य आहे हे दाखविण्यासाठी जशी कंदिलाची गरज नाही तद्वतच इतिहासाचे महत्व अमुक अमुक आहे असे समाजाला सांगण्याची जरूरी नाही. इतिहासाचे मूल्य स्वयंसिध्द असते. नेत्यांपासून ते अनुयायांपर्यन्त आणि राज्यकर्त्यांपासून ते प्रजाजनांपर्यन्त प्रत्येकाला ऐतिहासिक दृष्टिकोनाचा आधार घेतल्याशिवाय पुढे पाऊल टाकता येत नाही. इतिहास व ऐतिहासिक दृष्टी यांची संपन्नता मानवाच्या हाताशी असल्यामुळे भविष्याची घडण घडविण्याची कला या सृष्टीत फक्त मानवालाच लाभलेली आहे. इतिहासाच्या या भूमिकेमुळे सुधारलेल्या सुसंस्कृत राष्ट्रात इतिहासाची जोपासना करण्याची तत्परता वेगाने साकार होत आहे.

ऐतिहासिक घटनांच्या अभ्यासाने मुले तर्क करू शकतात. स्वत:चे योग्य मत बनवू शकतात. मनुष्याला स्वत:चे योग्य मत बनविता येणे ही जीवनातील महत्वाची गोष्ट आहे आणि हे इतिहासाच्या अभ्यासाने शक्य आहे.

स्वदेशाभिमानाची जनतेमध्ये जागृती करण्यास, तिची स्मृती कायम ठेवण्यास, तिची जोपासना करून ती वाढीस लावण्यास इतिहासासारखे दुसरे साधन नाही. समाजासमाजामध्ये ऐक्य निर्माण करण्याची शक्ती इतिहासामध्ये फार मोठी आहे. अशी अजब शक्ती असलेला बहुधा दुसरा विषय नाही. देशोदेशींच्या घटनांच्या अभ्यासामुळे दृष्टी व्यापक बनते. विश्वबंधुत्वाचे नाते जागतिक सरकार या कल्पना व्यापक दृष्टीची परिपक्व फळे आहेत. इतिहास वाचल्याने समजते की, प्रत्येक समाजात युध्द, तह, परिणाम, महान्कृत्ये, चुका या सारख्याच आहेत. हा दृष्टिकोन आल्यावर इतिहास ही ऐक्य करणारी प्रचंड शक्ती आहे याची प्रचिती येते.

सारांशाने, इतिहास माणसाची कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती व सारासार विचारशक्ती विकसित करतो. मानवाला गतकालातील चुका सुधारण्यास संधी देतो, शहाणे करण्याचा प्रयत्न करतो. आंतरराष्ट्रीय सामंजस्याची भावना व विश्वबंधुत्वाची शिकवण या विषयातून दिली जाते म्हणून सद्य जागतिक स्थितीत इतिहास या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ३.३ इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दतींची गरज व इतिहास अध्यापनपध्दती :

प्रत्येक विषयांच्या अध्यापनाची उद्दिष्टे वेगळी असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक विषयाच्या अध्यापनाच्या पध्दतीही भिन्न असतात. थोड्या वेळात व परिश्रमात तो विषय शिकविण्याचा आपला हेतू साध्य करण्याचा अचूक मार्ग म्हणजे तो विषय शिकविण्याची पध्दती होय.

अध्यापन पध्दतीचे महत्व विशद करताना कोठारी कमिशनने म्हटले आहे, "Even the best curriculum and most perfect syllabus remain dead unless, quickened into life by the

right methods of teaching and the right kind of teachers" (Kochhar S.K., 1984)

शिक्षकाने उद्दिष्टांचा विचार करून अशा पध्दतीची निवड करावी की त्या पध्दतीने विद्यार्थ्यांना ज्ञान व अनुभूती दिल्याने विद्यार्थ्यांची आकलनक्षमता, चिकित्सक विचार करण्याची क्षमता, कौशल्ये, अभिरूची, अभिवृत्ती इत्यादींचा विकास होईल. इतिहास शिक्षकाला अध्यापनाच्या विविध पध्दतींचे ज्ञान असले पाहिजे कारण विशिष्ट घटक शिकविण्यासाठी योग्य त्या पध्दतीची त्याला निवड करता आली पाहिजे. यशस्वी अध्यापनासाठी निश्चित अशी एकच पध्दती वा एकच मार्ग नाही. गेल्या काही दशकात विविध अध्यापन साधने, माध्यमे, पध्दती, तंत्रे यांच्यात वाढ झाली आहे. शिक्षकाने इतिहासाचे अध्यापन मनोरंजक, उत्साववर्धक व प्रभावी करण्यासाठी वेगवेगळया क्लुप्त्या, तंत्रे, पध्दती यांचा संयुक्तपणे वापर करावयास हवा.

केवळ पाठांतराने इतिहासाचे ज्ञान मिळविता येत नाही. इतिहासाच्या अभ्यासाने मुलांना ऐतिहासिक घटनांमधील कार्यकारणभाव जाणता आला पाहिजे, वर्तमानकालीन घडामोडींचा अर्थ लावता आला पाहिजे व भविष्यकाळासाठीचा काही अंदाज करता आला पाहिजे. यासाठी इतिहासाचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांच्या गरजा व अनुभव विश्वाशी संबंधित अनुभूती दिल्यास त्याद्वारे दिलेले ज्ञान निश्चित व वास्तव असते.

इतिहासाच्या ज्ञानाने मुलांना मर्मदृष्टी, सामंजस्य आले पाहिजे. हे ज्ञान देण्यासाठी, कौशल्ये, अभिवृत्ती, दृष्टिकोन विकसित करण्यासाठी विविध पध्दतींचा वापर केला पाहिजे. पध्दतीप्रमाणे अध्यापन करण्यासाठी शिक्षकाकडे भरपूर विषयज्ञान असले पाहिजे यासाठी त्याने सतत वाचन केले

पाहिजे तरच त्याला योग्य त्या पध्दतीची निवडकरून प्रभावीरित्या अध्यापन करता येईल. इतिहास अध्यापनाच्या महत्वाच्या पध्दती खाली दिल्या आहेत :

१) कथन पध्दती
२) आधार पध्दती
३) क्रमिक पुस्तक पध्दती
४) नाटयीकरण पध्दती
५) समस्या पध्दती
६) चर्चा पध्दती
७) स्वाध्याय पध्दती
८) योजना पध्दती
९) चरित्र पध्दती
१०) पोवाडा पध्दती
११) प्रश्नोत्तर पध्दती
१२) लेखक पध्दती
१३) समवाय पध्दती.

३.४ अध्यापन पध्दती व अध्यापन कार्यनीती यातील फरक :

अध्यापन पध्दती म्हणजे वर्गात अध्यापन विषयाच्या प्रतिपादनाची शैली होय.

" विषयाच्या अध्यापनामध्ये सामान्यत: येणाऱ्या क्रमवार कृतींची ठराविक रचना म्हणजे अध्यापन पध्दती होय. अध्यापन पध्दतीमध्ये कार्यनीती आणि क्लृप्त्या यांचा समावेश होतो. शिवाय पध्दतीत काय शिकवायचे आणि ते कोणत्या क्रमाने शिकवावयाचे यांचाही अंतर्भाव होतो."
(शर्मा आर.ए., १९८०)

अध्ययनाचे हेतू साध्य करण्यासाठी वापरले जाणारे साधन म्हणजे अध्यापन कार्यनीती होय.

" अध्यापन कार्यनीती म्हणजे अध्यापन पाठाची सर्वसाधारण योजना होय. या योजनेत अध्यापनाच्या उद्दिष्टांनुसार विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीत घडवून आणावयाच्या अपेक्षित बदलांचा आराखडा आणि अध्यापन कार्यनीतींचा अवलंब करण्यासाठी आवश्यक अशा नियोजित क्लृप्त्यांची रूपरेषा यांचा समावेश असतो." (शर्मा आर.ए., १९८०)

सामान्यत: अध्यापन पध्दती व अध्यापन कार्यनीती या दोहोंत फारसा फरक केला जात नसला तरी बारकाईने विचार करता दोहोंत असलेला फरक खालीलप्रमाणे देता येईल.

१) अध्यापन पध्दती ही संघटना-कार्य केंद्रीत, सनातनवादी सिध्दांतावर आधारित आहे. अध्यापन कार्यनीती मात्र संघटन कार्य केंद्रीत व संबंध केंद्रित आधुनिक सिध्दांतावर आधारलेली आहे.

२) अध्यापनाचा आशय आणि प्रतिपादन पध्दती हे अध्यापन पध्दतीचे प्रमुख घटक होत. आशयानुसार पध्दती ठरत असते. वर्तणुकीतील अपेक्षित बदलांचे हेतू व अध्ययन प्रक्रियेची परिस्थिती हे दोन अध्यापन कार्यनीतीचे मूलभूत घटक होत. अध्यापन हेतूंवरून अध्यापन कार्यनीती ठरत असते.

३) कार्यनीती ही संज्ञा युध्दशास्त्रातून घेतलेली असून पध्दती ही संज्ञा अध्यापनशास्त्रातून घेतलेली आहे.

४) कार्यनीतीमध्ये अंशात्मक दृष्टिकोन वापरला जातो. पध्दतीमध्ये मात्र समग्रलक्षी दृष्टिकोन वापरण्यात येतो.

५) अध्यापनात क्लृप्त्यांच्या सहाय्याने कार्यनीतींचा अवलंब केला जातो तर अध्यापन तंत्राच्या सहाय्याने पध्दतींचा अवलंब केला जातो. क्लृप्त्यांचा अधिकतर संबंध अध्ययन संरचनेशी असतो तर अध्यापनतंत्राचा संबंध प्रतिपादन पध्दती आणि आशयाचे स्वरूप यांच्याशी असतो.

६) अध्यापन कार्यनीतीच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन हे कसोटी चाचणीच्या सहाय्याने हेतू कितपत साध्य झाले आहेत हे पाहून केले जाते, तर अध्यापन पध्दतीचे मूल्यमापन संपादन चाचणीचा वापर करून विषयावर कितपत प्रभुत्व मिळविले हे पाहून केले जाते.

७) योग्य अशी अध्ययन परिस्थिती निर्माण करणे हा हेतू साध्य करण्यावर अध्यापन कार्यनीतीचा प्रमुख भर असतो तर विषयावर प्रभुत्व मिळविण्याच्या दृष्टीने विषयाचे परिणामकारक प्रतिपादन करणे हे अध्यापन पध्दतीचे ध्येय होय.

३.५ <u>अध्यापन कार्यनीतींचे प्रकार</u> :

शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या वर्तनात अपेक्षित असा वर्तनबदल घडवून आणण्यासाठी अध्यापनकृतींची योजना करतो. ज्या कार्यनीती विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमतांचा पूर्णपणे लाभ उठविण्यास उपयुक्त ठरतात अशा कार्यनीतींची शिक्षक निवड करतो. वेगवेगळया प्रकारच्या अध्ययन उद्दिष्टांची परिणामकारकतेने परिपूर्ती करणाऱ्या अध्यापन कार्यनीतींबाबत शिक्षकाला सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. खाली काही अध्यापन कार्यनीती दिल्या आहेत.

१) <u>व्याख्यान कार्यनीती</u> - Lecture Strategy

व्याख्यान हे ज्ञानप्रसारण कार्यनीती म्हणूनही ओळखले जाते. शाळांतून अजूनही मोठ्या प्रमाणावर या पध्दतीचा वापर केला जातो. या कार्यनीतीद्वारे विषयांश पूर्णपणे सांगितला जातो. विषयज्ञान समवाय साधून दिले जाते. या कार्यनीतीच्या प्रभावी उपयोजनासाठी इतिहासाच्या शिक्षकाने ऐतिहासिक घटना वा संबोध स्पष्टीकरण करीत असताना शैक्षणिक साधनांचा वापर केला पाहिजे. इतिहास शिक्षकाने प्रतिपादन हेतुपूर्ण व मनोरंजक करण्यासाठी तार्किक प्रश्न विचारणे आवश्यक आहे.

या कार्यनीतीच्या वापरामुळे विद्यार्थ्यांची ऐकूण घेण्याची सवय विकसित होते. कमी वेळेत खूप विषयज्ञान देता येते. शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमनावर प्रभाव पडतो. प्रश्नोत्तर तंत्र, योग्य साधने वापरून व्याख्यान प्रभावी करता येते.

<u>मर्यादा</u> -

१) विद्यार्थ्यांचा सहभाग कमी असतो.
२) वरच्या वर्गासाठीच उपयुक्त ठरते.
३) या कार्यनीतीत व्यक्तिभेदाचा विचार केला जात नाही.
४) शिक्षकाचे विषयावर प्रभुत्व असेल तरच ही कार्यनीती प्रभावी ठरते.
५) कित्येकदा शिक्षक विषयांश सोडून विवेचन करतात त्यामुळे विद्यार्थी परीक्षेत फारसे यश संपादन करू शकत नाहीत.

२) <u>पाठ दिग्दर्शन कार्यनीती</u> -
Lesson Demonstration Strategy

तंत्रशाळा व प्रशिक्षण महाविद्यालयात वापरली जात असलेली पाठ दिग्दर्शन ही पारंपारिक कार्यनीती आहे. ज्ञानात्मक व क्रियाकौशल्यात्मक उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी वापरली जाते.

पाठ दिग्दर्शन प्रभावीरित्या होण्यासाठी विषयावर प्रभुत्व असलेल्या व विविध अध्यापनविषयक कौशल्यात पारंगत असलेल्या शिक्षकाने पाठ दिग्दर्शन करावे. पाठ दिग्दर्शन हे चर्चात्मक असावे.

मर्यादा -

१) या कार्यनीतीद्वारे विद्यार्थी शिक्षकाच्या ठिकाणी मूळस्थितीत असलेल्या कौशल्यांच्या विकासाची संधी दिली जात नाही. विद्यार्थी नमुना पाठाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात.
२) शिक्षक-प्रशिक्षक पाठाचे प्रात्यक्षिक पूर्णपणे बरोबर करू शकत नाही.

३) टयुटोरिअल्स कार्यनीती - Tutorials Strategy

ही व्यक्तिगत पातळीवरील कार्यनीती आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत समस्या जाणून घेऊन त्या सोडविणे हा या कार्यनीतीचा हेतू आहे. व्यक्तिभेदाचा विचार, शैक्षणिक मार्गदर्शन, विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यास सहाय्य या अध्यापनविषयक तत्वांवर ही कार्यनीती आधारलेली आहे.

अध्यापनविषयक ब-याच कृती टयुटोरिअल्स कार्यनीतीने व्यापल्या आहेत. उदा. सुपरव्हिजन टयुटोरिअल्स या प्रकारात विद्यार्थी व शिक्षक यांच्या भेटीचे नियोजन केले जाते. विद्यार्थी ऐतिहासिक घटनेवरील लेखन करतात व ते वाचतात, त्यावर मते मांडतात. ही कार्यनीती विद्यार्थ्यांच्या कुवतीनुसार त्यांना त्या विषयाचे अधिक सखोल ज्ञान मिळविण्याची संधी देते. याशिवाय Group Tutorials आणि Practical Tutorials असे आणखी टयुटोरिअल्सचे प्रकार पडतात.

टयुटोरिअल कार्यनीती अधिक प्रभावी बनण्यासाठी खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे.

१) विद्यार्थ्यांची योग्यता लक्षात घेऊन टयुटोरिअल्स तयार करावीत.

२) शिक्षकाने विद्यार्थ्यांना वस्तुनिष्ठतेने हाताळावे

३) विद्यार्थ्यांना स्वत: समस्या सोडविण्यास प्रेरणा द्यावी.

४) शिक्षकाने त्याच्या अभिरूचीच्या विषयातील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवाव्यात.

मर्यादा -

१) वेगवेगळया विषयांशी संबंधित असलेल्या अडचणी एक शिक्षक सोडवू शकत नाही.

२) प्रत्येक विद्यार्थ्याची समस्या सोडविण्यात शिक्षक अभिरूची घेत नाही.

३) सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची समान संधी मिळत नाही. काही विद्यार्थी प्रभावी ठरतात.

४) क्रमान्वित अध्ययन - (Programmed Learning)

या कार्यनीतीमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत क्रांती झाली आहे. ही कार्यनीती लहान-लहान पायऱ्यांचे तत्व, कृतियुक्त प्रतिसादाचे तत्व, तात्काळ पडताळणीचे तत्व, स्वत:च्या गतीने प्रगती इत्यादी तत्वांवर आधारलेली आहे. विद्यार्थी कृतिशील रहातात. प्रत्येक बरोबर प्रतिसादाला प्रबलन मिळत असल्याने विद्यार्थ्यांना क्रमपाठ सोडविण्यात अभिरूची निर्माण होते. अध्ययनार्थी स्वत:च्या कुवतीनुसार प्रगती करतो.

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ही कार्यनीती जास्त उपयुक्त व परिणामकारक ठरते. शिक्षकांनी संबोध स्पष्टीकरणासाठी क्रमपाठांचा उपयोग करावा.

मर्यादा -

१) क्रमपाठ तयार करणे खर्चिक होते. चांगला क्रमपाठ तयार करणे अतिशय अवघड असते.
२) सर्व विषयांसाठी क्रमपाठ तयार करणे अवघड असते.
३) ज्ञानात्मक पातळीवरील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठीच उपयोग होतो.

५) प्रश्नोत्तर कार्यनीती Question-Answer Strategy

या कार्यनीतीत प्रश्नोत्तर पध्दतीने ज्ञान देणे यावर भर असतो. प्रश्न तयार करून अध्ययनार्थींची उत्सुकता वाढविली जाईल अशाप्रकारे प्रश्न विचारावेत. या कार्यनीतीनुसार विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत सहभागी होतात व कृतिशील रहातात. ही कार्यनीती माध्यमिक स्तरावर अतिशय उपयुक्त ठरते. इतिहास विषयात या कार्यनीतीचा जास्तीत जास्त वापर करता येतो. प्रश्नोत्तर कार्यनीतीचा वापर प्रभावीरित्या होण्यासाठी खालील बाबी लक्षात ठेवाव्यात.

१) व्याख्यान व कथनाला जोड म्हणून प्रश्नोत्तर कार्यनीतीचा वापर करावा.
२) वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा विचार करून प्रश्नांचे वितरण करावे.
३) शिक्षकाने विनोदी शैलीने वर्गातील कंटाळवाणे वातावरण दूर करावे.
४) प्रत्यक्ष अध्यापन करीत असताना तात्काळ नवीन प्रश्न जे शिक्षक तयार करू शकतात तेच या कार्यनीतीचा समर्थपणे वापर करू शकतात.

६) <u>शोधतंत्र कार्यनीती</u> - (Hauristics Strategy)

अध्ययनार्थीने स्वत: काही सांगितले पाहिजे व त्याला स्वत:ला जितके शिकता येईल तितके स्वत: शिकले पाहिजे या हर्बार्ट स्पेन्सर यांच्या शैक्षणिक विचारावर ही कार्यनीती आधारलेली आहे. समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नप्रमाद आणि शोधतंत्र यांचा या कार्यनीतीत वापर केला जातो.

या कार्यनीतीत विद्यार्थ्यांपुढे प्रश्न सादर केला जातो. प्रश्नाच्या अनुरोधाने अध्ययनार्थी स्वतंत्रपणे विचार करतो. समस्येच्या सोडवणुकीसाठी अध्ययनार्थी आपापसात चर्चा करतात. समस्या सोडविण्यासाठी शिक्षक उपयुक्त पुस्तके सुचवितात. या कार्यनीतीद्वारा अध्ययनार्थींच्या निरीक्षणात्मक व शास्त्रीय दृष्टिकोनाचा विकास होतो. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. अध्ययनार्थींना व्यक्तिगत मार्गदर्शन मिळते व ते कृतिशील रहातात. अध्ययनार्थींच्या तर्कशक्तीचा व कल्पनाशक्तीचा विकास केला जातो.

इतिहास विषयात ऐतिहासिक घटनांचे अध्ययनार्थींना चांगले आकलन व्हावे यासाठी काही घटनांबाबतची समस्यात्मक परिस्थिती निर्माण करुन अध्ययनार्थींना तार्किकदृष्टया विचार करावयास लावणे, समस्यांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करण्याची वृत्ती वाढविणे यासाठी ही कार्यनीती उपयुक्त ठरते.

<u>मर्यादा</u> -

१) शोधतंत्र कार्यनीती ही खालच्या वर्गासाठी उपयुक्त नाही.
२) ही कार्यनीती अधिक वेळ खाणारी आहे.

७) <u>प्रोजेक्ट कार्यनीती</u> - (Project Strategy)

विद्यार्थ्यांचे समाजीकरण साधणे व समस्या निराकरण क्षमता वाढविणे यावर प्राजेक्ट कार्यनीतीचा भर असतो. अध्ययनार्थीला समस्येच्या निराकरणाचे महत्व पटलेले असते व तो त्या समस्येच्या निराकरणाची योजना तयार करतो. त्यासाठी आवश्यक ती माहिती गोळा करतो. शिक्षकाची भूमिका मार्गदर्शकाची असते.

ही कार्यनीती उपयुक्ततेचे तत्व, तयारीचे तत्व, कृतीद्वारे शिक्षणाचे तत्व, कृती करण्याचे स्वातंत्र्य, सामाजीकरणाचे तत्व या तत्वांवर आधारलेली आहे. यामुळे अध्ययनार्थींची सांघिक कार्य करण्याची वृत्ती व सहकार्य भावना यांची वाढ होते. इतिहास विषयात उपयुक्त ठरणारी ही कार्यनीती आहे.

<u>मर्यादा</u> -

१) विषयज्ञान क्रमश: व पध्दतशीररित्या देता येत नाही.
२) सर्व विषयांसाठी योजना तयार करता येत नाहीत व योजनेनुसार प्रत्येक विषयाचे पूर्णांशाने ज्ञान देता येत नाही.
३) प्रोजेक्ट कार्यनीती फार खर्चिक व वेळ खाऊ आहे.

८) <u>पुनरावलोकन (उजळणी) कार्यनीती</u> (Review Strategy)

पुनरावलोकन कार्यनीती ही अतिशय महत्वाची विद्यार्थी केंद्रित कार्यनीती आहे. पाठ्यांश शिकवून झाल्यावर शिक्षक संबंधित पाठ्यांशाच्या उजळणीसाठी मार्गदर्शक व संदर्भ पुस्तके सुचवितात. त्यातून विद्यार्थी आवश्यक तेवढी माहिती जमा करतात. या कार्यनीतीद्वारे स्वत: व स्वतंत्रपणे चिकित्सक अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. इतिहास विषयात एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाबाबत चर्चा अथवा वादविवाद यासाठी ही कार्यनीती उपयुक्त ठरते.

9569

A

शिक्षकाने या कार्यनीतीचा वापर करताना प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र घटक अथवा समस्या द्यावी. समस्येशी संबंधित साहित्य सुचविताना ते ग्रंथालयात आहे काय पहावे, विद्यार्थ्यांना उजळणी आराखडा द्यावा व ती सोडविण्यासाठी निश्चित असा कालावधी द्यावा व विद्यार्थ्यांच्या कृतींचे पर्यवेक्षण करून मार्गदर्शन करावे.

<u>मर्यादा</u> -

१) विद्यार्थी स्वत: विचार करण्यापेक्षा शिक्षकाच्या मार्गदर्शनावर मोठया प्रमाणात अवलंबून रहातात.

२) विशेषत: मंदबुध्दीच्या विद्यार्थ्यांना ही कार्यनीती उपयुक्त ठरत नाही.

३) विद्यार्थी माहिती गोळा करतात पण त्यावर आधारित चिकित्सक परीक्षण करीत नाहीत.

९) <u>सांघिक चर्चा कार्यनीती</u> - (Group Discussion Strategy)

ही अतिशय लोकशाही पध्दतीची अध्यापन कार्यनीती आहे. या कार्यनीतीत शैक्षणिक समस्येच्या सोडवणूकीसाठी सांघिक चर्चेची व्यवस्था केली जाते. शिक्षक गटाचे प्रमुख रहातात. विद्यार्थ्यालाही गटाचे प्रमुखपद देता येते. गट प्रमुखाने चर्चेचे नियोजन करावयाचे असते. कृतियुक्त प्रतिसादाचे तत्व, कृतिस्वातंत्र्याचे तत्व व सांघिक कार्याचे तत्व या तत्वांवर ही कार्यनीती आधारलेली आहे.

ऐतिहासिक असे काही प्रसंग, घटना विद्यार्थ्यांपुढे मांडून शिक्षक चर्चा घडवून आणू शकतात. मात्र शिक्षकाने विद्यार्थ्यांना चर्चेत सहभागी होण्यासाठी प्रेरणा दिली पाहिजे. विषयाशी संबंधित नसलेल्या चर्चेस प्रोत्साहन देऊ नये.

१०) भूमिका पालन कार्यनीती (Role Playing Strategy)

ही कार्यनीती प्रशिक्षण संस्थामध्ये उपयुक्त ठरते. शिक्षकाला वर्गातील भूमिका चांगल्याप्रकारे वठविता यावी यासाठी आवश्यक अशा सामाजिक कौशल्यांचा विकार करणे हे या कार्यनीतीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ही नाटयीकरणात्मक कार्यनीती आहे. विद्यार्थी-शिक्षकाला विद्यार्थी व शिक्षक अशा दोन्ही भूमिका पार पाडाव्या लागतात. प्रत्यक्ष वर्ग अध्यापनापूर्वी विद्यार्थी-शिक्षकाला सरावाची संधी दिली जाते.

या कार्यनीतीचा प्रभावीपणे उपयोग करून घेण्यासाठी विद्यार्थी-शिक्षकाला या कार्यनीतीबाबत पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थी शिक्षकांना प्रत्यक्ष वर्ग अध्यापन करण्यासाठी जावे लागणार आहे त्यांच्यापुढे व त्यांच्या समवेत सराव करावा. मात्र अध्ययन परिस्थिती फारच कृत्रिम असल्याने विद्यार्थी शिक्षक स्वत:चा खरा प्रतिसाद देण्यास विसरतात.

११) स्वाध्याय कार्यनीती - (Assignment Strategy)

इतर विषयांप्रमाणे इतिहास विषयातही या कार्यनीतीचा मोठया प्रमाणात वापर करता येतो. सरावाचे तत्व, अभिरूचीचे तत्व, कृतिद्वारे शिक्षण, व्यक्तिभेदाचे तत्व इत्यादी मानसशास्त्रीय तत्वांवर ही कार्यनीती आधारलेली आहे.

या कार्यनीतीद्वारे विद्यार्थ्यांच्या वाचन व अभ्यासाच्या रूचीचा विकास केला जातो. विद्यार्थी स्वत:च्या अनुभवातून शिकतात. विद्यार्थ्यांना व्यक्तिगत पातळीवरून मार्गदर्शन केले जाते. स्वाध्याय कार्यनीतीचा प्रभावी-रित्या वापर होण्यासाठी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

स्वाध्याय हा अध्यापनाच्या विषयज्ञानावर अथवा घटकावर आधारित असावा. स्वाध्यायाची रचना सोपी असावी. स्वाध्याय सोडविण्यासाठी संदर्भ पुस्तकांची नावे सुचवावित. स्वाध्याय विद्यार्थ्यांची कुवत, योग्यता व अभिरुचीला अनुसरून असावेत. फार मोठे स्वाध्याय असू नयेत. विद्यार्थ्यांना दिलेले स्वाध्याय तात्काळ तपासावेत व स्वाध्यायांना ग्रेड द्याव्यात.

१२) संशोधन कार्यनीती- Discovery Strategy

जे. एस. ब्रूनर यांनी ही कार्यनीती मांडली. संशोधन कार्यनीती व शोधतंत्र कार्यनीती ( Heuristics Strategy) या दोन्ही कार्यनीती सारख्याच अर्थाने जरी वापरल्या जात असल्या तरी त्या भिन्न आहेत. संशोधन कार्यनीती ही सामाजिक विषयासाठी तर शोधतंत्र कार्यनीती ही शास्त्र विषयासाठी उपयुक्त ठरते. वैज्ञानिक संबोधाबाबतचे वस्तुनिष्ठ ज्ञान देण्यासाठी तिचा उपयोग होतो तर संशोधन कार्यनीतीचा उपयोग ऐतिहासिक घटनांचे ज्ञान देण्यासाठी होतो. या कार्यनीतीद्वारे इतिहासातील गतकाळात घडलेल्या घटनांची माहिती देता येते. तसेच शैक्षणिक सहलीतून पाहिलेल्या ऐतिहासिक ठिकाणांची माहिती देता येते.

विद्यार्थी स्वत: क्रियाशील राहून समजून घेऊन मर्मदृष्टीने शिकतात. सामाजिक घटना पूर्णपणे समजतात व विद्यार्थी सहजतेने त्या घटनांशी एकरूप होतो. या कार्यनीतीमुळे विद्यार्थ्यांमधील उपक्रमशीलतेचा विकास साधला जातो. अध्ययनार्थींची पृथ:क्करणाची, एकत्रीकरणाची व मूल्यमापनाची क्षमता यांचा विकास केला जातो. या कार्यनीतीद्वारे उच्च पातळीवरील ज्ञानात्मक व भावात्मक उद्दिष्टांची पूर्ती केली जाते.

१३) <u>संगणक सहाय्यक अनुदेशन कार्यनीती</u> -
Computer Assisted Instruction Strategy

कॉम्प्युटरचा वापर आदी प्रथम प्रशासन विभागात व कारखान्यात केला जात होता.परंतु आता शैक्षणिक प्रक्रियेवर कॉम्प्युटरचा प्रभाव पडला आहे. कॉम्प्युटरद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या कुवतीनुसार घटकांबाबतची अधिक माहिती दिली जाते. अवघड व गुंतागुंतीच्या भागाचे अध्यापन करण्यासाठी १९६५ मध्ये Stolurow आणि Davis यांनी कॉम्प्युटरचा वापर केला. आज शिक्षकाचे काम कॉम्प्युटर करू लागला आहे.

संगणाचा वापर करताना अध्यापन प्रक्रियेचे नियोजन Pretutorial Phase आणि Tutorial Phase या पायऱ्यांना अनुसरून करावे लागते. Pretutorial Phase चे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे विशिष्ट विद्यार्थ्याने निश्चित अशा साधनांचा वापर करून आपल्या उद्दिष्टांची पूर्ती करून घ्यावी. Pretutorial Phase चा मुख्य हेतू म्हणजे योग्य सामुग्रीची निवड करून ती अध्ययनार्थी पुढे मांडणे. यात विद्यार्थ्यांच्या प्रतिसादाचे नियंत्रण केले जाते.

विद्यार्थ्यांच्या वर्तनाचा विचार करून कॉम्प्युटरद्वारे योग्य साधन-सामुग्रीची निवड केली जाते. साधनसामुग्रीची निवड करताना खालील तीन शक्यता संभवतात :

१) साधनसामुग्रीची निवड करावी लागते.
२) एकापेक्षा अधिक साधनसामुग्रीची निवड करावयाची असते.
३) साधनसामुग्रीची निवड केली नाही तर कॉम्प्युटर अध्ययनार्थीला प्रतिसाद देत नाही.

या कार्यनीतीद्वारे मोठया प्रमाणात वैयक्तिकीकरण साधले जाते. प्रत्येक बरोबर प्रतिसादाला तात्काळ प्रबलन दिले जाते. ज्ञानात्मक पातळी-वरील उद्दिष्टांची परिणामकारकरित्या पूर्ती होते. ही कार्यनीती मानसशास्त्रीय तत्त्वांवर आधारलेली आहे.

१४) <u>बुध्दिमंथन कार्यनीती</u> (Brainstorming Strategy)

एकाच विषयाबद्दलचे विविध विचार, अनेक कल्पना विकसित करण्यासाठी या कार्यनीतीचा उपयोग होतो. लहान गटातील चर्चेचाच हा एक प्रकार आहे. एखाद्या समस्येची उकल करण्यासाठी जी सृजनात्मक समूह प्रक्रिया केली जाते तिचा निर्देश ऑसबर्न याने इ.स. १९५७ मध्ये `बुध्दि-मंथन` हे नाव वापरून प्रथम केला.

बुध्दिमंथन या कार्यनीतीचा वापर करताना खालील बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

अ) समस्येवर उपाय शोधण्यासाठी गटाकडून जास्तीतजास्त कल्पना, विचार पुढे येणे यावर भर असला पाहिजे.

ब) एखाद्या वादग्रस्त अथवा वादळी विचारावर चर्चा करणे अधिक फलप्रद ठरते.

क) विचारांच्या अथवा कल्पनांच्या मुक्त अभिव्यक्तीला वाव असावा.

ड) दुसऱ्यांनी मांडलेल्या विचारात अथवा कल्पनांत सुधारणा सुचविणे महत्त्वाचे मानले जावे.

इ) चर्चेत सहभागी होणाऱ्यांकडून विध्वंसक टीका होणार नाही याची दक्षता घ्यावी.

आशय व संस्कार या दोन्ही पैलूंना महत्व देणाऱ्या इतिहास विषयातही या कार्यनीतीचा वापर करता येईल. शिकवावयाचा विषय व प्रत्यक्ष जीवन यांचा अनुबंध साधणे, विषयाच्या अध्ययन-अध्यापनाबाबत शिक्षकांप्रमाणेच विद्यार्थ्यांनीही विचार करणे या गोष्टी साधावयाच्या असतील तर विद्यार्थ्यांना विचार करण्यास व ते मुक्तपणे मांडण्यास संधी देणे आवश्यक असते. ती संधी या कार्यनीतीद्वारे दिली जाते.

बुध्दिमंथन कार्यनीतीद्वारे एकाच विषयाच्या विविध पैलूंची चर्चा तुलनात्मकदृष्टया कमी वेळेत होऊ शकते. ही कार्यनीती लहान व मोठया अशा दोन्ही गटांसाठी वापरता येते. खास वर्गरचनेची गरज लागत नाही. गटातील बहुतेकांना बोलके करण्यास उपयुक्त ठरते. विचारांच्या मुक्त प्रकटनास वाव मिळतो. इतरांचे विचार समजून घेण्याची दृष्टी प्राप्त होते. विशिष्ट विषयाला धरून विचार करण्याची सवय लागते.

<u>मर्यादा</u> -

१) या कार्यनीतीचे यश हे बरेचसे नियोजकांच्या प्रतिभेवर अवलंबून असते.
२) गट चर्चेचा सारांश नोंदण्यासाठी वेळ लागत असेल तर त्यामुळे चर्चेची गती रोधली जाते.
३) विचार करणे व विचार मुद्देसूदरीतीने मांडणे याबाबतचा सराव नसेल तर या कार्यनीतीच्या यशस्वितेला मर्यादा पडतात.

१५) <u>स्वयंअभ्यास कार्यनीती</u> - Independent Study

' इनडिपेंडंट स्टडी ' यालाच Baskin यांनी प्रोजेक्ट कार्य असे म्हटले आहे. या कार्यनीतीद्वारे अध्ययनार्थींतील नेतृत्वाचा गुण व जबाबदारीच्या गुणांचा विकास केला जातो. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये या कार्यनीतीचा चांगला उपयोग होतो.

या कार्यनीतीत वाचन व काम करण्यासाठी स्वतंत्र गट पाडले जातात. हे कार्य विद्यार्थी शिक्षकाच्या गैरहजेरीत करतात. ही कार्यनीती म्हणजे नियमित अध्यापनाचा भाग आहे. बुध्दिमान विद्यार्थी या पध्दतीने अभ्यास करतात.

कृती व वाचनाचे स्वातंत्र्य, स्वयं अभ्यास, व्यक्तिभेदाचे तत्व, कामातील सहभागाचे तत्व इत्यादी तत्वांवर ही कार्यनीती आधारलेली आहे. इतिहास विषयात या कार्यनीतीचा वापर अधिक प्रमाणात करता येईल.

स्वयं अभ्यास या कार्यनीतीमुळे अध्ययनार्थीच्या स्वत:च्या विचाराला वाव दिला जातो. अध्ययनार्थीच्या ज्ञानात्मक व सामाजिक क्षमतांचा विकास केला जातो. पारंपारिक कार्यनीतीपेक्षा ही कार्यनीती वरच्या दर्जाची आहे. अध्ययनार्थीना स्वत:च्या कुवती, गतीनुसार शिकण्यास योग्य अशी परिस्थिती निर्माण केली जाते. शिक्षक विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतात.

१६) <u>नेतृत्वरहित संघ कार्यनीती</u> –
Leaderless Group Strategy

शिक्षकांच्या गैरहजेरीत विद्यार्थ्यांच्या समस्या त्यांनी एकमेकात चर्चा व सूचना करून सोडवाव्यात हा या कार्यनीतीचा मुख्य हेतू आहे. या कार्यनीतीमध्ये असे मानले आहे की, शिक्षकाची हजेरी अध्ययनाची उद्दिष्टे साध्य होण्यास सहाय्यभूत ठरत नाही. Simon Stuart यांनी १९६९ मध्ये माध्यमिक शाळेत तिचा वापर करून या कार्यनीतीची परिणामकारकता स्पष्ट केली आहे.

<u>फायदे</u> –

१) नेतृत्वरहित संघ कार्यनीती ही अध्ययनार्थीच्या मनावरील ताण कमी करते.

२) अध्ययनार्थींना स्वत:च्या समस्या स्वत: सोडविण्यास प्रोत्साहन देते.

३) समस्या सोडविण्यात झालेल्या चुका दर्शविल्या जातात व चांगल्या बाबींची प्रशंसा केली जाते. त्यामुळे अध्ययनार्थीचे चांगले प्रत्यामरण होते.

४) शिक्षकांच्या गैरहजेरीमुळे अध्ययनार्थींना स्वतंत्रपणे काम करण्यास संधी मिळते.

५) अध्ययनार्थीला त्याच्या समस्या निराकरणाबाबतचे विचार अथवा भावना मुक्तपणे व्यक्त करता येतात.

६) अध्ययनार्थी त्याच्या बौध्दिक क्षमतांचा व सामाजिक कौशल्यांचा वापर करू शकतो.

<u>मर्यादा</u> -

१) शिक्षकाच्या गैरहजेरीत विद्यार्थ्यांमध्ये उपयुक्त अशी चर्चा होईलच असे नाही.

२) चर्चेत होणाऱ्या चुका अथवा वादविवाद विद्यार्थी टाळू शकतील असे नाही.

## ३.६ <u>समारोप</u> :

उपरोक्त दिलेल्या अध्यापन कार्यनीतींवरून आपल्याला असे आढळून येते की, इतिहास विषयाचे अध्यापन प्रभावी, आकर्षक व परिणामकारक-रित्या करण्याच्या दृष्टीने कशा पध्दतीचे नियोजन करता येईल व त्याद्वारे योग्य वर्तनबदल विद्यार्थ्यांत घडवून आणता येईल याचा विचार केला आहे. इतिहास अध्यापकांनी अध्यापन कार्यनीतींचा वापर करावा. असा वापर

केल्याने निर्धारित वेळेत, कमी श्रमात, अधिक प्रभावीपणे अध्यापन करून अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. तसेच विद्यार्थीही स्वयं-अध्ययन पद्धतीने शिकू शकतील.

## प्रकरण चौथे

## प्रश्नावली व मुलाखतीद्वारे आलेल्या माहितीचे वर्गीकरण व अन्वयार्थ

४.१ प्रस्तावना

`अ` विभाग

अध्यापक प्रश्नावलीद्वारे आलेल्या माहितीचे वर्गीकरण व अन्वयार्थ

४.२ इतिहास अध्यापकांची अर्हता व अध्यापन अनुभव

अ) इतिहास अध्यापकांची शैक्षणिक पात्रता

ब) इतिहास अध्यापकांची व्यावसायिक पात्रता

क) इतिहास अध्यापकांचा अध्यापन अनुभव

४.३ इतिहास अध्यापकांची इतिहास विषयाबाबतची अभिरुची

४.४ इतिहास अध्यापकांना कराव्या लागणाऱ्या इतर विषयांच्या अध्यापनाबाबतचे विश्लेषण

४.५ इतिहास अध्यापकांचा सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबतचा दृष्टिकोन

४.६ शाळेतील इतिहास विषयक संदर्भ ग्रंथांच्या उपलब्धतेबाबतचे विश्लेषण.

४.७ अभ्यासपूरक कार्यक्रम

अ) इतिहास अध्यापकांना ऐतिहासिक उपक्रम राबविण्यास शाळेकडून मिळणारे सहकार्य

ब) इतिहास मंदिराची शालेय स्थिती

क) ऐतिहासिक सहली व इतिहास विषयक कार्यक्रम

४.८ इ. ९ वीच्या इतिहास विषयाच्या सर्वसाधारण उद्दिष्टांना महत्वांशानुसार अध्यापकांनी दिलेला अनुक्रम

४.९ इतिहासाच्या अभ्यासक्रमातून उद्दिष्टांच्या होणाऱ्या पूर्ततेबाबतची इतिहास अध्यापकांची मते.

४.१० इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट असणाऱ्या प्रकरणांची योग्यायोग्यता

४.११ इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमातील विषयांशाच्या परिपूर्णतेबाबतची इतिहास अध्यापकांची मते

४.१२ अध्यापनासाठी निर्धारित केलेल्या अध्यापन तासिकांबाबतची इतिहास अध्यापकांची मते

४.१३ पाठ्यांश पृथ:क्करणाबाबतची इतिहास अध्यापकांची मते

४.१४ इतिहास अध्यापक वापरीत असलेल्या अध्यापन पध्दतीबाबतचे विश्लेषण

४.१५ इतिहास विषयाच्या अध्यापनात अध्यापकांनी वापरलेल्या दृकश्राव्य साधनांबाबतचे विश्लेषण

४.१६ इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी

अ) काठिण्यपातळीबाबतची इतिहास अध्यापकांची मते

ब) अध्यापकास स्वत: अध्यापन करावी लागणारी व विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास देता येणारी प्रकरणे

क) विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन पध्दतीने शिकण्याच्या कृतीबाबतची इतिहास अध्यापकांची मते

४.१७ ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणाबाबत इतिहासअध्यापकांचा दृष्टिकोन

अ) ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापक वापरीत असलेल्या पध्दतीबाबतचे विश्लेषण

ब) ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापकांनी वापरलेल्या शैक्षणिक साधनांबाबतचे विश्लेषण

क) संबोध स्पष्टीकरणासाठीच्या शैक्षणिक साहित्याची शाळेतील उपलब्धता

४.१८ इ. ९ वीचा इतिहासाचा अभ्यासक्रम व मूल्यशिक्षण

अ) इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांबाबतची इतिहास अध्यापकांची मते

ब) निर्धारित मूल्यांव्यतिरिक्त अन्य मूल्यांबाबतची इतिहास अध्यापकांची मते

## 'ब' विभाग

४.१९ प्रशिक्षण महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या मुलाखतीद्वारे आलेल्या माहितीचा अन्वयार्थ

## ४.१ प्रस्तावना :

प्रकरण क्रमांक तीनमध्ये इतिहास विषयाचे महत्व, इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दतींची गरज, अध्यापन पध्दती व अध्यापन कार्यनीती यातील फरक तसेच अध्यापन कार्यनीतीचे प्रकार इत्यादीचा ऊहापोह केला आहे. प्रस्तुत प्रकरणात ` अ ` विभागात तासगाव तालुक्यातील इ. ९ वीला इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या २५ अध्यापकांनी भरून दिलेल्या प्रश्नावल्यांद्वारे जमा झालेल्या माहितीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावला आहे. ` ब ` विभागात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील इतिहास विशेष अध्यापन पध्दतीचे अध्यापन केलेल्या व करीत असलेल्या १० अधिव्याख्यात्यांच्या मुलाखतीद्वारे जमा झालेल्या माहितीचा अन्वयार्थ लावला आहे.

### ` अ ` विभाग

### अध्यापक प्रश्नावलीद्वारे आलेल्या माहितीचे वर्गीकरण व अन्वयार्थ

## ४.२ इतिहास अध्यापकांची अर्हता व अध्यापन अनुभव :

### अ) इतिहास अध्यापकांची शैक्षणिक पात्रता :

प्रस्तुत संशोधन विषय " माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्ययन अध्यापन कार्यनीतींचे विकसन " असा आहे. अध्ययन-अध्यापन कार्यनीतींचे योग्य नियोजन करण्यासाठी शिक्षकांचे विषयज्ञान सखोल सकस असण्याची गरज आहे. अन्यथा अध्यापनात कार्यनीतींचे योग्य नियोजन होणार नाही. दर्जेदार अध्ययन अनुभूती देण्यासाठी विषय शिक्षकांचा दर्जा लक्षात घ्यावा लागतो. अध्ययन-अध्यापन कार्यनीतींमधील शिक्षक हा एक महत्वाचा घटक आहे. शिक्षक हा एकूण शिक्षण पध्दतीचा कणा आहे.

प्रस्तुत खालील संदर्भित सारणीच्या समोर पाना
या उद्देशाने चित्रक आकृती जोडत आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. तीन व चारमध्ये इतिहास अध्यापकांना त्यांची शैक्षणिक पात्रता नोंदविण्यास सांगितले होते. त्यानुसार आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१ मध्ये केलेले आहे.

सारणी क्र. ४.१

इतिहास अध्यापकांची शैक्षणिक पात्रता

| | |
|---|---|
| १) पदवी व पदव्युत्तर स्तरावर इतिहास विषय असणारी अध्यापक संख्या. | १० |
| २) पदवी व पदव्युत्तर स्तरावर दुय्यम विषय असणारी अध्यापक संख्या. | ३ |
| ३) पदवी स्तरावर इतिहास पण पदव्युत्तर स्तरावर इतिहास विषय नसलेली अध्यापक संख्या. | १ |
| ४) पदवी पातळीवर इतिहास विषय असणारी अध्यापक संख्या | ६ |
| ५) दुय्यम विषयाचे पदवीधर असणारी अध्यापक संख्या. | ५ |
| एकूण अध्यापक : | २५ |

वरील सारणी क्र. ४.१ वरून असे दिसून येते की, एकूण २५ इतिहास अध्यापकांपैकी १७ अध्यापकांनी पदवी पातळीवर इतिहास विषयाचे अध्ययन केले आहे. इतर ८ अध्यापकांनी पदवी पातळीवर दुय्यम विषयाचे अध्ययन केले आहे. १४ अध्यापकांनी पदव्युत्तर अर्हता प्राप्त केलेली आहे. पदवी पातळीवर इतिहासाचे अध्ययन न केलेले ८ अध्यापक इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करीत आहेत असे दिसते.

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुद्ध बाजूने लावला आहे.

ब) इतिहास अध्यापकांची व्यावसायिक पात्रता :

इतिहास अध्यापकांची व्यावसायिक पात्रता जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीतील प्रश्न क्र. पाच व सातवी योजना केली होती. त्यानुसार आलेल्या माहितीचे वर्गीकरण खालील सारणी क्र. ४.२ मध्ये केलेले आहे.

सारणी क्र.४.२

इतिहास अध्यापकांची व्यावसायिक पात्रता

| व्यावसायिक | | बी.एड्.ला अध्यापन पध्दती घेतलेली अध्यापक संख्या | बी.एड्.ला इतिहास अध्यापन पध्दती नसलेली अध्यापक संख्या |
|---|---|---|---|
| पदवी बी.एड्. | पदव्युत्तर एम.एड्. | | |
| २५ | १ | २० | ५ |

वरील सारणी क्र. ४.२ वरून असे दिसून येते की, व्यावसायिक पातळीवरील पदवी (बी.एड्.) संपादन केलेले एकूण २५ अध्यापक आहेत व त्यापैकी व्यावसायिक पातळीवरील पदव्युत्तर शिक्षण (एम.एड्.) घेतलेली अध्यापक संख्या एक आहे.

व्यावसायिक पदवीसाठी दोन पध्दतींची निवड करावयाची असते. उपलब्ध माहितीवरून असे दिसून येते की, पदवी पातळीवर (बी.एड्.) इतिहास विशेष पध्दती म्हणून निवड केलेल्या अध्यापकांची संख्या २० आहे तर ५ अध्यापक इतर विशेष पध्दतीचे आहेत.

प्रस्तुतच्या आकडेवारीवरून असे दिसते की, पदवी पातळीवरील व्यावसायिक पदवी (बी.एड्.) ही आवश्यक असल्यामुळे घेतली जाते. पदव्युत्तर पातळीवरील व्यावसायिक अध्ययनाची आवड एकदमच कमी झालेली दिसते. याचा अर्थ व्यावसायिक शिक्षणाविषयीची अभिरूची मुळातच कमी असावी असे दिसते. अध्यापक प्रशिक्षणाची पदवी ही व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करण्यसाठी असते. व्यावसायिक दृष्टिकोनाविषयीची अनास्था ही इतर विषयांप्रमाणे इतिहास विषयावरही परिणाम करू शकते.

क) इतिहास अध्यापकांचा अध्यापन अनुभव :

इतिहास अध्यापकांचा इ. ९ वीला इतिहासाचे अध्यापन करण्याचा अनुभव जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ७ची योजना केली होती. त्यानुसार आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.३ मध्ये दिले आहे.

सारणी क्र.४.३

इतिहास अध्यापकांचा इ. ९ वीला इतिहास शिकविण्याचा अनुभव

| अध्यापन अनुभव | अध्यापक संख्या |
|---|---|
| १) १ ते ५ वर्षापर्यन्त अध्यापन अनुभव असणारे अध्यापक. | ३ |
| २) ६ ते १० वर्षापर्यन्तचा अध्यापन अनुभव असणारे अध्यापक. | ४ |
| ३) ११ ते १५ वर्षापर्यन्तचा अध्यापन अनुभव असणारे अध्यापक. | ८ |
| ४) १६ वर्षापेक्षा अधिक अध्यापन अनुभव असणारे अध्यापक | १० |
| एकूण अध्यापक | २५ |

वरील सारणी क्र. ४.३ वरून निदर्शनास येते की, पाच वर्षांपेक्षा कमी अध्यापन अनुभव असलेले अध्यापक ३ आहेत. ६ ते १० वर्षांपर्यन्तचा इ.९ वीला इतिहास शिकविण्याचा अनुभव असलेली अध्यापक संख्या ४ आहे. ११ ते १५ वर्षांचा अध्यापन अनुभव असलेली अध्यापक संख्या ८ आहे व इ. ९ वीला इतिहासाचे अध्यापन करण्याचा १६ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेल्या अध्यापकांची संख्या १० आहे. एकूण २५ इतिहास अध्यापकांपैकी इ. ९ वीला इतिहासाचे अध्यापन करण्याचा १० वर्षांपेक्षा अधिक अनुभव असलेले १८ अध्यापक आहेत ही स्थिती समाधानकारक आहे.

४.३ इतिहास अध्यापकांची इतिहास विषयाबाबतची अभिरूची :

इतिहास अध्यापकांची इतिहास विषयाची अभिरूची व व्यासंग जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारणा केली असता आलेल्या माहितीचे विश्लेषण सारणी क्र. ४.४ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.४

ऐतिहासिक मासिके मागविणा-या व न मागविणा-या अध्यापकांची संख्या

| | |
|---|---|
| १) ऐतिहासिक मासिके मागविणारी अध्यापक संख्या. | ४ |
| २) ऐतिहासिक मासिके न मागविणा-या अध्यापकांची संख्या | २१ |
| एकूण अध्यापक : | २५ |

सारणी क्र. ४.४ वरून असे दिसते की, इतिहासाचे अध्यापक इतिहास विषयाची मासिके घेत नाहीत. विषयासंबंधीची मासिके मागविणारे अध्यापक फक्त चार आहेत. यावरून इतिहास अध्यापकांचा इतिहास विषयाचा

व्यासंग व अभिरूची आदीच कमी आढळते. इतिहासाचा व्यासंग कमी असलेल्या अध्यापकांकडून प्रभावी अध्यापन होणार नाही.

## ४.४ इतिहास अध्यापकांना कराव्या लागणाऱ्या इतर विषयांच्या अध्यापनाबाबतचे विश्लेषण :

इ. ९ वीला इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना इतर कोणकोणत्या विषयांचे अध्यापन करावे लागते हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीत आठव्या प्रश्नाची योजना केली होती. आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.५ मध्ये दिले आहे.

सारणी क्र. ४.५

इतिहास अध्यापक अध्यापन करीत असलेल्या विषयांचे विश्लेषण

| इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना अध्यापन करावे लागणारे अन्य विषय | अध्यापक संख्या |
|---|---|
| मराठी | १७ |
| हिंदी | ५ |
| इंग्रजी | १२ |
| गणित | २ |
| सायन्स | - |
| भूगोल | १८ |

सारणी क्र. ४.५ मधील विश्लेषणावरून असे दिसते की, इ. ९ वीच्या वर्गावर इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, भूगोल याही विषयांचे अध्यापन करावे लागते. परिणामी इतिहास विषयात इतिहास अध्यापकाला अभिरूची निर्माण झाली पाहिजे ती होत नाही. अध्यापकांच्या अभिरूचीचे विकेंद्रीकरण होते. शिक्षकास जबाबदारी झटकून टाकण्यास संधी उपलब्ध होते. शिक्षकास अध्यापनास विषय देताना विषयाचे चांगले अध्यापन होण्याच्यादृष्टीने नियोजन न होता त्यामध्ये शाळेची व्यवस्थापकीय सोय अधिक पाहण्याचा दृष्टिकोन दिसतो. याचा परिणाम विषयाच्या अध्यापनावर होतो.

हा विषय सामाजिकशास्त्रे या विषयांतर्गत शिकविला जात असल्याने आठवड्यात सामाजिकशास्त्रे या विषयाला केवळ पाच तासिका शासनाने निर्धारित केलेल्या आहेत. हा विषय पूर्ण मानला जात नाही तर एका विषयाचा अंशात्मक भाग म्हणून इतिहासाकडे पाहिले जाते. त्यामुळे व्यवस्थापकांचा या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन गौण स्वरूपाचा असतो. हा दृष्टिकोनच मुळात या विषयाला मारक व हानीकारक आहे. इतरांच्या या दृष्टिकोनामुळे इतिहास अध्यापकांचा दृष्टिकोनही इतिहासाकडे अंशात्मक पद्धतीने पाहण्याचा होतो हे सर्व अध्यापकांच्या विषयाबाबतच्या व्यासंगाला हानीकारक ठरते.

## ४.५ इतिहास अध्यापकांचा सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबतचा दृष्टिकोन :

इतिहास अध्यापकांची सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबतची भूमिका जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १० व ११ ची योजना केली होती. त्यांना अनुसरून जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.६ मध्ये दिलेले आहे.

प्रस्तुत खालील संबंधित तारणीच्या आणि याचा
या उद्देशाने विश्लेषण मांडून ठेवत आहे.

सारणी क्र. ४.६

इतिहास अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणा-
बाबतचे विश्लेषण

| | | |
|---|---|---|
| १) | सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज प्रतिपादन करणाऱ्या अध्यापकांची संख्या. | ११ |
| २) | सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज नाही म्हणणाऱ्या अध्यापकांचीसंख्या | १४ |
| | एकूण अध्यापक | २५ |

वरील सारणी क्र. ४.६ मधील आकडेवारीवरून असे दिसते की, सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज आहे म्हणणाऱ्या अध्यापकांपेक्षा गरज नाही म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या जास्त आहे. म्हणजेच ५० टक्के पेक्षा अधिक इतिहास अध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणाचे महत्त्व पटलेले दिसत नाही.

यावरून असे म्हणता येईल की, अध्यापकाने पदवी व पदव्युत्तर पातळीवर इतिहास विषयाचे जे अध्ययन केले असेल त्या अध्ययनाच्या संचयावरच त्यांचे अध्यापन अवलंबून असते. सदर अध्यापकांचा विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन गतिमान नसल्याचे आढळून येते. ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण नवीन ज्ञानाच्या प्रकाशात देण्याची गरज त्यांना भासत नाही असे दिसते. इतिहास विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांचा दृष्टिकोन मुळातच स्थितीशील असल्यामुळे विषयालाही तिच परिस्थिती प्राप्त झालेली दिसते. ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ इतर विविध विषयातील संशोधनावरून लावावयाचा असतो ही मूळ कल्पनाच इथे अध्यापकांला स्पष्ट नसल्याने विषयावर व अध्यापनावर परिणाम होतो.

प्रस्तुत आलेख संबंधित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुद्ध बाजूने जोडला आहे.

४.६ शाळेतील इतिहासविषयक संदर्भग्रंथांच्या उपलब्धतेबाबतचे विश्लेषण :

शाळेतील ग्रंथालयात पूरक व अवांतर वाचनासाठी पुरेसे संदर्भ ग्रंथ आहेत काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील १२ व्या प्रश्नाची योजना केली होती. आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.७ मध्ये दिले आहे.

सारणी क्र.४.७

संदर्भ ग्रंथांच्या शाळेतील उपलब्धतेबाबतचे विश्लेषण

| | |
|---|---|
| १) शाळेत इतिहासविषयक पुरेसे संदर्भ ग्रंथ आहेत असे म्हणणारी अध्यापक संख्या. | १८ |
| २) शाळेत इतिहासविषयक पुरेसे संदर्भ ग्रंथ नाहीत असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या. | ७ |
| एकूण अध्यापक : | २५ |

वरील सारणी क्र. ४.७ वरून दिसते की, शाळांमधून ऐतिहासिक संदर्भ ग्रंथांची उपलब्धता आहे असे म्हणणारे अध्यापक १८ आहेत. असे असेले तर इतिहास अध्यापकांनी उपलब्ध संदर्भ ग्रंथाचे वाचन करावे. शाळांनी संदर्भ ग्रंथाची उपलब्धता करून दिली आहे त्या संधीचा लाभ उठवावा.

४.७ अभ्यासपूरक कार्यक्रम :

इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे सफल व्हावीत, तसेच इतिहासाचे अध्यापन प्रभावी व्हावे विद्यार्थ्यांनी स्वत: अनुभूती घेऊन, जबाबदारी स्विकारून शिकावे यादृष्टीने अभ्यासपूरक कार्यक्रमांना महत्त्व असते.

अ) इतिहास अध्यापकांना ऐतिहासिक उपक्रम राबविण्यास शाळेकडून मिळणारे सहकार्य :

इतिहास विषयाबाबत नवीन उपक्रम राबविण्यास शाळेकडून सहकार्य मिळते किंवा काय हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्र. २३ ची योजना केली होती. त्यानुसार जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.८ मध्ये केले आहे.

सारणी क्र. ४.८

| नवीन ऐतिहासिक उपक्रम राबविण्यास शाळेकडून मिळणारे सहकार्य | |
|---|---|
| १) नवीन ऐतिहासिक उपक्रम राबविण्यास शाळेकडून सहकार्य मिळते असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या. | २३ |
| २) नवीन ऐतिहासिक उपक्रम राबविण्यास शाळेकडून सहकार्य मिळत नाही असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या. | २ |
| एकूण अध्यापक : | २५ |

वरील सारणी क्र. ४.८ मधील वर्गीकरणावरून असे दिसते की, नवीन ऐतिहासिक उपक्रम राबविण्यास शाळेकडून सहकार्य मिळते असे सूचित करणारे २३ अध्यापक आहेत. इतिहास अध्यापकांनी या सहकार्याचा लाभ घ्यावा व अधिकाधिक उपक्रमांचे आयोजन करावे.

ब) इतिहास मंदिराबाबतची शालेय स्थिती :

शाळेत इतिहास विषयाचे अध्यापन करण्यासाठी इतिहासाची स्वतंत्र खोली (इतिहास मंदिर) आहे काय हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्र. १६ ची योजना केली होती. प्रस्तुत संशोधनांतर्गत माध्यमिक शाळांपैकी एकाही

शाळेत इतिहास विषयाची स्वतंत्र खोली उपलब्ध नाही. याची कारण-मीमांसा केली असता असे आढळून आले की, बहुतांशी शाळांमध्ये जागेची अपूर्णता आहे. इतिहास खोली ही एक प्रयोगशाळा, कार्यशाळा, मंदिर असते. तिच्या विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांना वाव दिला जाऊ शकतो. इतिहास खोलीमुळे इतिहास विषयाविषयी एक वलय निर्माण होते. इतिहास खोलीच मुळात नसल्याने इतिहासविषयक दृष्टिकोन, अभिरूची निर्माण होऊ शकत नाही. समृध्द अशा ऐतिहासिक अनुभूतीपासून विद्यार्थी वंचित रहातात. त्यामुळे स्थानिक इतिहास, स्थानिक संदर्भ, स्थानिक वस्तू व ऐतिहासिक वातावरण निर्मिती इत्यादींचा लाभ मुलांना मिळत नाही.

क) ऐतिहासिक सहली व इतिहास-
विषयक कार्यक्रम :

शाळांमधून सहली काढल्या जातात काय ? तसेच इतिहासविषयक कोणकोणते उपक्रम साजरे केले जातात हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्र.१८ ते २२ यांची योजना केली होती. त्यानुसार आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.९ मध्ये केले आहे.

सारणी क्र. ४.९

ऐतिहासिक सहली व इतिहासविषयक कार्यक्रमांबाबतचे विश्लेषण

| ऐतिहासिक सहलीबाबतची मते दर्शविणाऱ्या अध्यापकांची संख्या | | | | इतिहासविषयक कार्यक्रमाबाबतची मते दर्शविणारी अध्यापक संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थानिक पातळी-मुलांना नेतो | तालुक्या-बाहेर नेतो | जिल्हा-बाहेर नेतो | राज्या-बाहेर नेतो | जयंत्या साजऱ्या करतो | पुण्य-तिथ्या साजऱ्या करतो | राष्ट्रीय दिन साजरे करतो | आंतर-राष्ट्रीय दिन |
| २५ | २५ | २५ | ५ | १२ | १२ | २५ | १० |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वरील सारणी क्र. ४.९ मधील वर्गीकरणावरून स्पष्ट होते की, संशोधनांतर्गत सर्वच्या सर्व माध्यमिक शाळा स्थानिक पातळीवरील इतिहास विषयक अध्ययन-अनुभूती प्रत्यक्ष जागेवर जाऊन देतात. त्याचप्रमाणे स्थानिक वर्तुळाबाहेर किंवा तालुक्याच्या बाहेर, जिल्हाबाहेरील ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी सर्व अध्यापक विद्यार्थ्यांना नेतात. केवळ २० टक्के अध्यापकांच्या-मते राज्याबाहेरील ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या जातात.

स्थानिक, तालुका व राज्यपातळीवरील ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या जातात ही वस्तुस्थिती असली तरी असे निदर्शनास येते की, या भेटी सहल एक आवश्यक शैक्षणिक उपक्रम म्हणूनच दिल्या जातात. त्यात शैक्षणिक दृष्टिकोनापेक्षा मनोरंजनाचाच भाग अधिक असतो.

ऐतिहासिक भेटीतील वारंवारिता व सहलीचा कालावधी ही कमी असतो स्थळांविषयीची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली जात नाही. भेटीचा उद्देश स्पष्ट होत नाही. ऐतिहासिक घटना व प्रसंगांचा संदर्भ दिला जात नाही. प्रत्यक्ष स्थळावर जी अनुभूती विद्यार्थ्यांना दिली जाते ती श्रेष्ठ दर्जाची असते. परंतु स्थळावर ऐतिहासिक परिणामकारकता साधली जात नाही. काही शाळा वर्षानुवर्षे ठराविकच स्थळांना भेटी देत असल्याने त्या स्थळांविषयी आदर निर्माण होत नाही व नाविण्यही रहात नाही.

शाळांतून जे इतिहासविषयक कार्यक्रम राबविले जातात त्यात ५० टक्के अध्यापकांच्या मते शाळांतून ऐतिहासिक थोर पुरूषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साज-या केल्या जातात. १०० टक्के अध्यापकांच्या मते शाळांतून राष्ट्रीय कार्यक्रम साजरे केले जातात. आंतरराष्ट्रीय दिन साजरे केले जातात असे ४० टक्के अध्यापकांनी म्हटले आहे.

कार्यक्रम कशा पध्दतीने साजरे केले जातात अशी विचारणा केली असता आलेल्या माहितीवरून असे निदर्शनास येते की, त्या दिवशी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्याख्याने इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र असे कार्यक्रम औपचारिक शैक्षणिक कार्यक्रम म्हणून साजरे केले जातात. त्या कार्यक्रमातून साध्य करावयाचा ऐतिहासिक हेतू साध्य होत नाही. उपक्रमापूर्वी कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी, दृष्टी, हेतू स्पष्ट केला जात नाही.

राष्ट्रीय दिनांबाबतही असे आढळून येते की, दिवसाचा सकाळचा ठराविक वेळच या उपक्रमासाठी दिला जातो. योग्य नियोजन नसल्याने उरलेली वेळ सुट्टी या सदरातच मोडते. वास्तविक पहाता राष्ट्रीय सण या दृष्टिकोनातून दिवसभर विविध उपक्रमांचे नियोजन करून संपूर्ण दिवसामध्ये राष्ट्रविषयीची विविध मूल्ये मुलांच्या मनावर बिंबविण्याची गरज असते ती पूर्ण केली जात नाही. परिणामत: तो सुट्टीचा दिवस मानला जाण्याची वृत्ती मुलांच्या मनामध्ये रूजविली गेली आहे. त्या दिवसाचे ऐतिहासिक मूल्य कोणीही लक्षात घेत नसल्याने राष्ट्रीय दिनांचा ऐतिहासिक वारसा गमावल्याचे निदर्शनास येते.

४.८ इ. ९ वीच्या इतिहास विषयाच्या सर्वसाधारण उद्दिष्टांना महत्वांशानुसार अध्यापकांनी दिलेला अनुक्रम :

इ. ९ वीच्या इतिहास अध्यापनाच्या सर्वसामान्य उद्दिष्टांचा महत्वांशानुसार क्रम जाणून घेण्यासाठी प्रश्नावली `ब` विभागातील प्रश्न क्र. १ वरची योजना केली होती. आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१० मध्ये केले आहे.

## सारणी क्र. ४.१०

### इतिहास अध्यापकांनी सर्वसामान्य उद्दिष्टांना त्यांच्या महत्वांशानुसार दिलेला क्रम

| अध्यापन पुस्तिकेतील उद्दिष्टांचा अनुक्रमांक | अध्यापकांनी त्याच उद्दिष्टांना दिलेला अनुक्रमांक | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| १ | ५ | २ | ३ | १ | ४ | ६ | ४ | २५ |
| २ | १ | ६ | २ | ७ | ३ | २ | ४ | २५ |
| ३ | ३ | ३ | १ | ५ | ३ | १ | ९ | २५ |
| ४ | ४ | ५ | १० | २ | २ | १ | १ | २५ |
| ५ | २ | १ | २ | ४ | ८ | ६ | २ | २५ |
| ६ | ७ | २ | ४ | ३ | १ | ६ | २ | २५ |
| ७ | ३ | ६ | ३ | ३ | ४ | ३ | ३ | २५ |
| | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | |

वरील सारणी क्र. ४.१० वरून असे निदर्शनास येते की, इ. ९ वीच्या इतिहास विषयाच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यानी तयार केलेल्या अध्यापन पुस्तिकेमध्ये इ. ९ वीच्या इतिहास विषयाच्या सर्वसामान्य उद्दिष्टांना दिलेला क्रम व इतिहास अध्यापकांनी त्याच उद्दिष्टांना महत्वांशानुसार दिलेला अनुक्रम यात तफावत दिसते. अध्यापन पुस्तिकेत उद्दिष्टांना दिलेले अनुक्रमांक व इतिहास अध्यापकांनी त्याच उद्दिष्टांना दिलेले अनुक्रमांक याप्रमाणे १-६, २-४, ३-७, ४-३, ५-५, ६-१, ७-२.

यावरून असे स्पष्ट होते की, उद्दिष्टे निश्चित करताना त्यांचे महत्व लक्षात न घेता ती निर्धारित केलेली आहेत. काही महत्वाच्या उद्दिष्टांना खालचा क्रमांक दिल्याचे तर काही कमी महत्वाच्या उद्दिष्टांना अधिक महत्व दिल्याचे निदर्शनास येते.

यावरून मुळात इतिहास उद्दिष्टांबाबतच धोरण निश्चित नसेल तर त्याचा अध्यापनावर परिणाम होतो. अध्यापकाची उद्दिष्टांबाबतची भूमिका जर निश्चित नसेल तर त्यांचेकडून केले गेलेले अध्यापन हे उद्दिष्टशून्य होईल व त्याचा परिणाम इतिहास अध्यापनावर होईल.

अध्यापन पुस्तिकेतील उद्दिष्टांव्यतिरिक्त आणखी महत्वाची सर्वसामान्य उद्दिष्टे कोणती याचा शोध घेतला असता उपलब्ध माहितीवरून असे निदर्शनास येते की, ८० टक्के अध्यापकांनी चारित्र्यसंपन्न नागरिक बनविणे, विद्यार्थ्यांचा नैतिक दर्जा वाढविणे अशा उद्दिष्टांचा उल्लेख केला आहे.

मुलांच्या विकासाची अवस्था लक्षात घेता, मानसिकदृष्टया नैतिक शिक्षणासाठी साधारणत: १५, १६ वर्षांचे विद्यार्थी हा काळ अनुकूल असतो. अनेक धर्मसंस्थापकांची धर्मस्थापना करण्याची तयारी, मनाची तशी घडण, रचना याच काळात झाली आहे. म्हणून याच काळात नैतिक शिक्षणावर भर दिला पाहिजे. मात्र नैतिक शिक्षणाशी संबंधित स्पष्ट असे उद्दिष्ट या अभ्यासक्रमासंदर्भात मानलेले नाही.

४.९ इतिहासाच्या अभ्यासक्रमातून उद्दिष्टांच्या
होणाऱ्या पूर्ततेबाबतची इतिहास अध्यापकांची मते :

इयत्ता ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून सर्वसामान्य उद्दिष्टांची पूर्ती होते काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्र. ३ व ४ ची योजना केली होती, त्यांना अनुसरून आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.११ मध्ये दिले आहे.

## सारणी क्र.४.११

**इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून होणाऱ्या उद्दिष्टपूर्तीबाबतची इतिहास अध्यापकांची मते**

| | |
|---|---|
| १) अभ्यासक्रमातून उद्दिष्टांची पूर्ती होते असे नमूद करणारी इतिहास अध्यापक संख्या. | २४ |
| २) अभ्यासक्रमातून उद्दिष्टांची पूर्ती होत नाही असे नमूद करणारी इतिहास अध्यापक संख्या. | १ |
| एकूण अध्यापक : | २५ |

वरील सारणी क्र. ४.११ वरून असे निदर्शनास येते की, बहुतांशी म्हणजे ९६ टक्के इतिहास अध्यापकांनी अध्यापन पुस्तिकेत निर्धारित केलेली इतिहासाची सर्वसामान्य उद्दिष्टे साध्य होतात असे नमूद केले आहे.

### ४.१० इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट असणाऱ्या प्रकरणांची योग्यायोग्यता :

इयत्ता ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केलेली प्रकरणे इ. ९ वीचा वयोगट लक्षात घेता योग्य आहेत काय ? आणि योग्य नसतील तर ती प्रकरणे काढून टाकावीत की त्यात काही दुरुस्ती करावी हे जाणून घेण्याच्या इच्छेने प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५ ची योजना केली होती. जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१२ मध्ये केले आहे.

## सारणी क्र.४.१२

इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातील प्रकरणांच्या समावेशाबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचा अभ्यासक्रमातील समावेश ` योग्य ` म्हणणारी अध्यापक संख्या | ` अयोग्य ` म्हणणारी अध्यापक संख्या | अभ्यास-क्रमातून काढून टाकावे | प्रकरणात सुधारणा सुचविणारी अध्यापक संख्या | दुसरे योग्य प्रकरण समाविष्ट करता येईल |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५ | - | - | - | - |
| २ | २५ | - | - | - | - |
| ३ | २५ | - | - | - | - |
| ४ | २५ | - | - | - | - |
| ५ | २५ | - | - | - | - |
| ६ | १८ | ७ | - | ७ | - |
| ७ | २५ | - | - | - - | - |
| ८ | २५ | - | - | - | - |
| ९ | २१ | ४ | - | ४ | - |
| १० | २१ | ४ | - | ४ | - |
| ११ | २५ | - | - | - | - |
| १२ | २५ | - | - | - | - |
| १३ | २१ | ४ | - | ४ | - |

सारणी क्र.४.१२ नुसार असे निदर्शनास येते की, इ. ९ वीच्या इतिहासाच्या पुस्तकातील प्रकरण क्रमांक १, २, ३, ४, ५, ७, ८, ११ व १२ या प्रकरणांचा समावेश योग्य आहे असे १०० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. प्रकरण क्रमांक ९, १०, १३ या प्रकरणांचा समावेश योग्य आहे असे ८४ टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. अभ्यासक्रमातील प्रकरण क्रमांक ६ हे ७२ टक्के अध्यापकांच्या मते योग्य आहे व २८ टक्के अध्यापकांच्या मते त्याचा समावेश योग्य नाही.

वरील माहितीवरून असे दिसून येते की, इ. ९ वीसाठी निर्धारित केलेला इतिहास विषयाचा अभ्यासक्रम हा बहुतांशाने योग्य आहे.

प्रश्न क्रमांक पाचमध्येच अभ्यासक्रमातील प्रकरणांचा समावेश योग्य नसेल तर त्यातील सुधारणेबाबतचे स्वत:चे मत द्या अशी विचारणा केली असता आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१३ मध्ये केले आहे. बदल सुचविलेली प्रकरणेच सारणीत दिली आहेत.

## सारणी क्र. ४.१३

### इतिहास अध्यापकांची अभ्यासक्रम सुधारणेबाबतची मते

| प्रकरण क्रमांक | प्रकरणांचे एकत्रिकरण करावे असे सुचविणारी अध्यापक संख्या | भाषा सोपी असावी असे सुचविणारी अध्यापक संख्या | माहिती विस्तृत द्यावी असे सुचविणारी अध्यापक संख्या |
|---|---|---|---|
| २, ३ | ७ | - | - |
| ४, ५ | ७ | - | - |
| ६ | - | ५ | ६ |
| ९ | - | ५ | ६ |
| १० | - | ५ | ६ |

वरील सारणी क्र. ४.१३ वरून असे निदर्शनास येते की, प्रकरण क्र. २ व ३ यांचे व प्रकरण क्र. ४ व ५ यांचे एकत्रीकरण करावे असे २८ टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे.

प्रकरण क्र. ६, ९ व १० मध्ये २० टक्के इतिहास अध्यापकांच्यामते भाषेच्या दृष्टीने सोपेपणा आणावा तर २४ टक्के अध्यापकांच्या मते या प्रकरणांमधील आशय विषयांश विस्तृत द्यावा.

## ४.११ इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमातील विषयांशाच्या परिपूर्णताबाबतची इतिहास अध्यापकांची मते :

इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात निर्धारित केलेल्या तेरा प्रकरणातील विषयांश पूर्ण आहे काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. सहाची योजना केली होती. त्याला अनुसरून आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१४ मध्ये केले आहे.

सारणी क्र. ४.१४

इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमातील विषयांशाच्या परिपूर्णताबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| प्रकरण क्रमांक | प्रकरणातील विषयांश पूर्ण आहे म्हणणारी अध्यापक संख्या | प्रकरणातील विषयांश पूर्ण नाही असे म्हणणारी अध्यापक संख्या |
|---|---|---|
| १ | २२ | ३ |
| २ | २५ | - |
| ३ | २५ | - |
| ४ | २२ | ३ |
| ५ | २२ | ३ |
| ६ | १९ | ६ |
| ७ | २५ | - |
| ८ | २५ | - |
| ९ | २२ | ३ |
| १० | २२ | ३ |
| ११ | २५ | - |
| १२ | २२ | ३ |
| १३ | २२ | ३ |

भारतातील लोकशाही समजवादास पोषक अशी मनोवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, गतिमान जीवनाची विचारमूल्ये आत्मसात करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर त्यांना वर्तमानकाळातील घडामोडींचे आकलन व्हावे, भवितव्य उज्वल करण्याची जाण निर्माण व्हावी, त्यातून त्यांना निकोप राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सर्वधर्मसमभाववृत्ती याबद्दल प्रेरणा मिळावी अशी इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे आहेत.

साहजिकच वरील उद्दिष्टांची पूर्ती करण्यास अनुरूप असे विषयज्ञान हवे. विषयज्ञानाच्या परिपूर्तीबाबत सारणी क्र. ४.१४ नुसार असे निदर्शनास येते की, प्रकरण क्र. २, ३, ७, ८, ११ या प्रकरणांमधील विषयांश परिपूर्ण आहे असे १०० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे.

प्रकरण क्रमांक १, ४, ५, ९, १०, १२ व १३ मधील विषयांश परिपूर्ण आहे असे ८८ टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. प्रकरण क्र. ६ मधील विषयांश परिपूर्ण आहे असे ७६ टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे.

एकंदरीत इतिहास अध्यापकांची मते दर्शविणाऱ्या आकडेवारीवरून विषयांश बहुतांशाने परिपूर्ण आहे असे दिसून येते.

### ४.१२ अध्यापकांसाठी निर्धारित केलेल्या अध्यापन तासिकांबाबतची इतिहास अध्यापकांची मते :

प्रत्येक कार्य व्यवस्थितरित्या पूर्ण होण्यास नियोजनाची गरज असते. अध्यापन हे देखील अतिशय महत्वाचे कार्य आहे. व्यापक शिक्षणाचे ते एक अंग असून ती एक अत्यंत गुंतागुंतीची व जबाबदारीची मानसिक प्रक्रिया आहे. अध्यापन हे निर्हेतुक व पूर्वनियोजनरहित असेल तर अपेक्षित उद्देश कधीही साध्य होऊ शकत नाहीत, म्हणून जो पाठविषय शिकवायचा

आहे त्यास किती वेळ लागणार याचेही नियोजन करणे आवश्यक असते.

इतिहास अध्यापनासाठी आवड्यात दोन तासिका असतात. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या इ. ९ वीच्या इतिहासाच्या अध्यापन पुस्तिकेत प्रत्येक प्रकरणासाठी दिलेल्या तासिका पुरेशा आहेत काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ७ ची योजना केली होती. आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१५ मध्ये केले आहे.

सारणी क्र. ४.१५

प्रकरणनिहाय दिलेल्या अध्यापन तासिकांबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| प्रकरण क्रमांक | नियोजित तासिका | तासिका पुरेशा आहेत म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या | तासिका पुरेशा नाहीत असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या | अपेक्षित तासिका |
|---|---|---|---|---|
| १ | ७ | २५ | - | - |
| २ | ५ | २५ | - | - |
| ३ | ५ | २५ | - | - |
| ४ | ४ | २५ | - | - |
| ५ | ३ | १५ | १० | ४ |
| ६ | ४ | १५ | १० | ५ |
| ७ | ४ | १५ | १० | ५ |
| ८ | ३ | १५ | १० | ४ |
| ९ | ४ | १५ | १० | ५ |
| १० | ३ | १४ | ११ | ४ |
| ११ | ५ | १५ | १० | ६ |
| १२ | ५ | १५ | १० | ६ |
| १३ | ५ | २५ | - | - |

वरील सारणी क्र. ४.१५ वरून असे दिसते की, प्रकरण क्र. १, २, ३, ४ व १३ यांच्या अध्यापनासाठी निर्धारित केलेल्या तासिका पुरेशा आहेत असे १०० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे.

प्रकरण क्र. ५, ६, ७, ८, ९, ११ व १२ यांच्या अध्यापनासाठीच्या निर्धारित तासिका पुरेशा आहेत असे ६० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. ४० टक्के अध्यापकांनी तासिका कमी पडतात असे नमूद केले आहे.

प्रकरण क्रमांक १० साठी दिलेल्या तासिका पुरेशा आहेत असे ५६ टक्के अध्यापकांनी नमूद केले तर ४४ टक्के अध्यापकांनी दिलेल्या तासिका अपु-या आहेत असे नमूद केले आहे.

वरील आकडेवारीवरून अध्यापकानेच स्वत: अध्यापन करून अभ्यासक्रम पूर्ण करावयाचा म्हटल्यास तासिका पुरत नाहीत असे दिसते.

अध्यापन पुस्तिकेत निर्धारित केलेल्या तासिकांपेक्षा जादा लागलेल्या तासिका कशा उपलब्ध केल्या जातात हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील सातव्या प्रश्नातच योजना केली होती. त्याला अनुसरून आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१६ मध्ये दिले आहे.

सारणी क्र. ४.१६

अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी इतिहास अध्यापक वापरीत असलेले पर्याय

| प्रकरण क्रमांक | रजेवरील अध्यापकाचे तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या अध्यापकांची संख्या | शाळेदिवशी सकाळी अथवा सायंकाळी जादा तास घेणाऱ्या अध्यापकांची संख्या |
|---|---|---|
| ५ | ६ | ४ |
| ६ | ६ | ४ |
| ७ | - | १० |
| ८ | - | १० |
| ९ | - | १० |
| १० | - | ११ |
| ११ | - | १० |
| १२ | - | १० |

सारणी क्र. ४. १६ वरून स्पष्ट होते की, जादा लागलेल्या तासिका अध्यापक रजेवरील अध्यापकांचे तास घेऊन व शाळेच्या दिवशीच सकाळी अथवा सायंकाळी जादा तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करतात. सुट्टी दिवशी व मोठया सुट्टीत तास घेता काय असे पर्याय दिले असूनही त्यात नोंद केलेली नाही. तसेच दिलेल्या पर्यायांव्यतिरिक्त अन्य पर्याय वापरीत असाल तर नोंद करावी असे सुचविले असता एकाही अध्यापकाने तशी नोंद केलेली नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

४.१३ पाठ्यांश पृथ:क्करणाबाबतची इतिहास
अध्यापकांची मते :

अध्यापनाचे नियोजन हे अध्यापकाचे महत्वाचे काम असते. सृजनशीलता, कल्पकता व मर्मदृष्टी वापरून अध्यापकाला अध्यापन विषयाचे मुद्दे व अध्ययनार्थींच्या वर्तनात अपेक्षित बदल यांची मांडणी करावी लागते. म्हणजेच अध्यापकाला पाठ्यांशाचे पृथ:क्करण करावे लागते. पृथ:क्करणात घटक, उपघटक, उपघटकातील मुद्यांची मांडणी तार्किकदृष्टया व क्रमाने करावी लागते तरच अपेक्षित उद्दिष्टे सफल होतात. पाठ्यांश पृथ:क्करण केल्यानेच परिणामकारक अध्यापनाचे नियोजन होऊ शकते.

इ. ९ वीचे इतिहासाचे पाठयपुस्तक महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी तयार केले आहे. इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमाचे पाठ्यांश पृथ:क्करण इतिहासाच्या अध्यापन पुस्तिकेत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी दिले आहे.

पाठ्यांश पृथ:क्करण करताना घटक, उपघटक व उपघटकातील महत्वाच्या मुद्यांची मांडणी तार्किकदृष्टया क्रमाने केली आहे काय ? प्रत्येक पाठाच्या उद्दिष्टांशी इतिहास अध्यापक सहमत आहेत काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ८ ची योजना केली होती. त्यानुसार आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.१७ मध्ये दिलेले आहे.

## सारणी क्र. ४.१७

### पाठ्यांश पृथःक्करणाबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| प्रकरण क्रमांक | उपघटकांची मांडणी योग्य आहे म्हणणारी अध्यापक संख्या | उपघटकांची मांडणी अयोग्य आहे म्हणणारी अध्यापक संख्या | उपघटकांच्या मांडणीत बदल सुच-विणारी अध्यापक संख्या | उद्दिष्टांशी सहमत अध्यापक संख्या | उद्दिष्टांशी असहमत अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५ | - | - | २५ | - |
| २ | २० | ५ | ५ | २५ | - |
| ३ | २५ | - | - | २५ | - |
| ४ | २५ | - | - | २५ | - |
| ५ | २५ | - | - | २५ | - |
| ६ | २० | ५ | ५ | २५ | - |
| ७ | २५ | - | - | २५ | - |
| ८ | २५ | - | - | २५ | - |
| ९ | २५ | - | - | २५ | - |
| १० | २५ | - | - | २५ | - |
| ११ | २५ | - | - | २५ | - |
| १२ | २५ | - | - | २५ | - |
| १३ | २५ | - | - | २५ | - |

वरील सारणी क्र. ४.१७ वरून असे निदर्शनास येते की, प्रकरण क्रमांक २ व ६ व्यतिरिक्त सर्व प्रकरणातील उपघटकांची मांडणी तार्किक-दृष्टया योग्य आहे असे १०० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे.

प्रकरण क्र. २ व ६ मधील उपघटकांची मांडणी तार्किकदृष्टया योग्य आहे असे ८० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे, तर २० टक्के अध्यापकांनी उपघटकांची मांडणी तार्किकदृष्टया योग्य नाही असे नमूद केले आहे.

बदल सुचविणाऱ्या पाच अध्यापकांनी प्रकरण क्रमांक २ मध्ये उपघटक एक याला जोडून चौथा उपघटक घ्यावा असे सुचविले आहे. प्रकरण क्र. सहामध्ये समाजवादाचा प्रसार हा उपघटक अधिक विस्ताराने घावा असे पाच अध्यापकांनी नमूद केले आहे.

अध्यापन नियोजन या पहिल्या टप्प्यातच अध्यापनाच्या उद्दिष्टांचा विचार करावा लागतो. विद्यार्थ्यांच्या वर्तनात अपेक्षित बदल घडविण्याचा अध्यापकाचा जो प्रयत्न असतो त्यासाठी उद्दिष्टे साहाय्यभूत ठरतात. म्हणून अध्यापकांच्या दृष्टिकोनातून या उद्दिष्टांना अधिक महत्व असते.

वरील सारणी क्र. ४.१७ नुसार अध्यापन पुस्तिकेत प्रत्येक प्रकरणाच्या दिलेल्या उद्दिष्टांशी सर्वच्या सर्व म्हणजे १०० टक्के अध्यापक सहमत आहेत.

## ४.१४ इतिहास अध्यापक वापरीत असलेल्या अध्यापन पध्दतीबाबतचे विश्लेषण :

अध्यापन करीत असता पाठ्यांश लक्षात घेऊन योग्य त्या पध्दतींची निवड करणे फार महत्वाचे असते. कारण उद्दिष्टांची पूर्ती होण्यासाठी समृध्द अनुभूती देणे महत्वाचे असते. कोणत्या पध्दतीच्या वापराने अध्ययन सुलभ होईल व इच्छित हेतू सहजगत्या सफल होतील याचा विचार करून पध्दतीची निवड अध्यापकाने केली पाहिजे.

इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करीत असताना प्रत्येक प्रकरणा-साठी अध्यापकांनी कोणत्या पध्दती निवडलेल्या आहेत हे जाणून घेण्यासाठी

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ९ ची योजना केली होती. त्याला अनुसरून आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१८ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र.४.१८

इतिहास अध्यापकांनी इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करताना वापरलेल्या अध्यापन पध्दतीबाबतचे विश्लेषण

| प्रकरण क्रमांक | कथन पध्दती | पाठयपुस्तक पध्दती | चर्चा पध्दती | प्रश्नोत्तर |
|---|---|---|---|---|
| १ | २५ | - | - | - |
| २ | २० | - | ५ | - |
| ३ | २० | ५ | - | - |
| ४ | २० | ५ | - | - - |
| ५ | २० | - | ५ | - |
| ६ | २५ | - | - | - |
| ७ | २० | - | ५ | - |
| ८ | २५ | - | - | - |
| ९ | २५ | - | - | - |
| १० | २५ | - | - | - |
| ११ | २० | - | - | ५ |
| १२ | २० | - | - | ५ |
| १३ | २० | - | - | ५ |

वरील सारणी क्र. ४.१८ वरून असे निदर्शनास येते की, प्रकरण क्र. १,६,८,९ व १० च्या अध्यापनासाठी १०० टक्के अध्यापक कथन पध्दतीचा वापर करतात.

प्रकरण क्र. २, ६ व ७ यांच्या अध्यापनासाठी ८० टक्के अध्यापक कथन पध्दतीचा वापर करतात तर २० टक्के अध्यापक चर्चा पध्दतीचा वापर करतात.

प्रकरण क्र. ३ व ४ च्या अध्यापनासाठी ८० टक्के अध्यापक कथन पध्दतीचा वापर करतात व २० टक्के अध्यापक पाठ्यपुस्तक पध्दतीचा वापर करतात.

प्रकरण क्रमांक ११,१२ व १३ यांच्या अध्यापनासाठी ८० टक्के अध्यापक कथन पध्दतीचा वापर करतात व २० टक्के अध्यापक प्रश्नोत्तर पध्दतीचा वापर करतात.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांकासमोर विविध पध्दती दिल्या होत्या त्या प्रकरणासाठी वापरीत असलेल्या पध्दती दर्शविण्यास सांगितले होते. अध्यापकांनी ज्या पध्दती दर्शविल्या तेवढयाच पध्दती सारणीत घेतल्या आहेत.

इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करताना इतिहासाचे अध्यापक विविध अध्यापन कार्यनीतींचा वापर करतात काय ? आणि करीत असतील तर कोणत्या अध्यापन कार्यनीती वापरतात हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १० ची योजना केली होती. आलेल्या माहितीवरून असे दिसते की, बहुसंख्य अध्यापक विविध अध्यापन कार्यनीतींचा वापर करीत नाहीत. व्याख्यान कार्यनीतीचाच अधिकाधिक वापर केला गेल्याचे दिसते.

## ४.१५ इतिहास विषयाच्या अध्यापनात अध्यापकांनी वापरलेल्या दृकश्राव्य साधनांबाबतचे विश्लेषण :

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत दृकश्राव्य साहित्याचे महत्व अनन्य साधारण आहे. मात्र योग्य साहित्याची निवड करणे हे अध्यापकांपुढे आव्हानच असते.

प्रस्तुत पानेस संबंधित सारणीच्या ओर पाना
या उद्देशाने विरुद्ध बाजूने जोडला आहे.

अध्ययन परिस्थिती व अध्ययनाची उद्दिष्टे यांचा विचार करून दृकश्राव्य साहित्याची निवड करावी लागते. दृकश्राव्य साहित्याच्या वापराने अध्ययनार्थींची अवबोध क्षमता वाढते, धनसंक्रमणाचा लाभ होतो व घटनांचे चांगले आकलन होते. त्यांची धारणाशक्ती वाढते, विद्यार्थी क्रियाशील रहातात. मिळविलेले ज्ञान दीर्घकाळ टिकते.

इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करताना अध्यापक कोणती दृकश्राव्य साधने वापरतात व त्या साधनांचा वापर किती प्रमाणात केला जातो हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ११ ची योजना केली होती. जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र.४.१९ मध्ये दिले आहे.

सारणी क्र.४.१९

इतिहास अध्यापकांनी अध्यापनात वापरलेल्या दृकश्राव्य साहित्याबाबतचे विश्लेषण

| प्रकरण क्रमांक | संबंधित पाठासाठी दृकश्राव्य साहित्य वापरलेल्या अध्यापकांची संख्या | | |
|---|---|---|---|
| | नकाशे | चित्रे | तक्ते |
| १ | १५ | १० | ५ |
| २ | १५ | १२ | ८ |
| ३ | १२ | १० | ७ |
| ४ | १५ | ८ | ८ |
| ५ | १५ | - | ८ |
| ६ | २० | १३ | - |
| ७ | २० | ८ | १५ |
| ८ | १५ | १० | १० |
| ९ | २२ | १० | १२ |
| १० | १५ | १८ | १० |
| ११ | १० | १० | ९ |
| १२ | १० | १० | ७ |
| १३ | २० | १० | ५ |
| | २०४ | १३० | १०४ |
| सरासरी अध्यापक संख्या | १६ | १० | ८ |

वरून

वरील सारणी क्र. ४.१९ असे निदर्शनास येते की, इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करीत असताना वापरलेल्या विविध दृक्श्राव्य साधनांचे प्रकरणवार संकलित संख्येचा विचार करून त्या साधनाचा वापर करणाऱ्या अध्यापकांचे सरासरी प्रमाण पुढे दिले आहे. नकाशाचा वापर करणारी सरासरी अध्यापक संख्या १६, चित्रांचा वापर केलेली सरासरी अध्यापक संख्या १० व तक्त्यांचा वापर करणारी सरासरी अध्यापक संख्या ८ आहे. प्रश्नावलीत वरील दृकश्राव्य साधनांपेक्षा अधिक साधनांची प्रकरणांपुढे यादी दिली होती. त्या संबंधित प्रकरणात वापर करीत असलेल्या साधनांपुढे नोंद करावयास सांगितले होते. अध्यापकांनी नोंद केलेल्या साधनांचाच सारणीत उल्लेख केला आहे.

## ४.१६ इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी :

प्रस्तुत संशोधनाचे इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमाची काठिण्य-पातळी, ऐतिहासिक संबोध व मूल्यशिक्षण यांचा विचार करून विभागणी करणे असे एक उद्दिष्ट आहे. अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांची कुवत, अभिरूची, गरजा यांचा विचार करून तयार केला पाहिजे. अभ्यासक्रमातून उद्दिष्टांची पूर्ती व्हावी, भाषा मुलांच्या आवाक्यातील हवी. विषयज्ञान बिनचूक व त्याची मांडणी संगतवार केली जावी. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घटनांचे सुलभतेने आकलन झाले पाहिजे.

### अ) काठिण्यपातळीबाबतची इतिहास अध्यापकांची मते :

इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १२ ची योजना केली होती. त्याला अनुसरून जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२० मध्ये दिलेले आहे.

प्रस्तुत आलेख दर्शित सारणीच्या समोर यावा
या उद्देशाने विरुद्ध बाजूने छापला आहे.

## सारणी क्र. ४.२०

इतिहास अध्यापकांनी इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमाची दर्शविलेली काठिण्यपातळी

| प्रकरण क्रमांक काठिण्य-पातळी | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | एकूण अध्यापक संख्या | सरासरी अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अतिशय सोपे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| सोपे | ९ | १९ | १९ | १८ | १५ | - | - | - | ५ | - | २० | २० | ५ | १३२ | १० |
| मध्यम | १६ | ६ | ६ | ७ | १० | ५ | १५ | १६ | २० | १५ | ५ | ५ | २० | १४६ | ११ |
| कठिण | - | - | - | - | - | २० | १० | ९ | - | १० | - | - | - | ४९ | ४ |
| अतिशय कठिण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

सारणी क्र. ४.२० वरील विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, इ. ९ वीच्या इतिहासाची प्रकरणवार काठिण्यपातळी दर्शविणाऱ्या अध्यापकांच्या संख्येवरून संकलित केलेल्या अध्यापक संख्येचे सरासरी प्रमाण प्रकरण क्रमांक १ ते १३ मध्ये सोपा अभ्यासक्रम म्हणणारी सरासरी अध्यापक संख्या १० मध्यम म्हणणारी अध्यापक संख्या ११ व अभ्यासक्रमण कठिण म्हणणारी अध्यापक संख्या ४ आहे.

ब) अध्यापकास स्वत: अध्यापन करावी लागणारी व <u>विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास देता येणारी प्रकरणे</u> :

शिक्षकाला वर्गात अध्यापन करीत असताना फलकलेखन, आकृती काढणे, नकाशात स्थळ दाखविणे, विद्यार्थ्यांना प्रश्न विचारणे, स्पष्टीकरण करणे, तक्ता भरणे इत्यादी कृती कराव्या लागतात. विषयज्ञानाची काठिण्यपातळी जास्त असेल तर त्यातील क्लिष्ट घटनांचे विवेचन शिक्षकालाच करावे लागते. ऐतिहासिक संबोधांचे स्पष्टीकरणही अध्यापकालाच करावे लागते.

शिक्षणात स्वत: अनुभव घेऊन जे ज्ञान मिळविले असेल ते दीर्घकाळ लक्षात राहते. स्वत:च्या समस्या स्वत: सोडविणे, कल्पना करणे, नवनिर्मिती करणे यात स्वनिर्मितीचा आनंद असतो. यादृष्टीने इ.९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातील कोणती प्रकरणे अध्यापकाला स्वत: शिकवावी लागतील व कोणती प्रकरणे विद्यार्थ्यांना स्वत: शिकण्यासाठी देता येतील हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १३ ची योजना केली होती. त्याला अनुसरून जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२१ मध्ये केलेले आहे.

## सारणी क्र. ४.२१

अध्यापन करावे लागणाऱ्या व विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास देता येणाऱ्या प्रकरणांबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| प्रकरण क्रमांक | अध्यापकाने स्वत: अध्यापन करावे असे सुचविणारी अध्यापक संख्या | स्वयंअध्यापनास द्यावीत असे सुचविणारी अध्यापक संख्या |
|---|---|---|
| १ | २५ | - |
| २ | २५ | - |
| ३ | १० | १५ |
| ४ | १६ | ९ |
| ५ | ५ | २० |
| ६ | २५ | - |
| ७ | २५ | - |
| ८ | २५ | - |
| ९ | २५ | - |
| १० | २५ | - |
| ११ | ५ | २० |
| १२ | ५ | २० |
| १३ | २५ | - |

वरील सारणी क्र. ४.२१ वरून असे निदर्शनास येते की प्रकरण क्र. १, २, ६, ७, ८, ९, १०, १३ ही प्रकरणे अध्यापकांनी स्वत: शिकवावीत असे १०० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे.

प्रकरण क्र.३ हे ६० टक्के अध्यापकांच्या मते स्वयंअध्ययनास द्यावे. प्रकरण क्र. ५, ११ व १२ स्वयंअध्ययनास द्यावीत असे ८० टक्के अध्यापकांनी सुचविले आहे.

### क) विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन पध्दतीने शिकण्याच्या कृतीबाबतची इतिहास अध्यापकांची मते :

विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास जी प्रकरणे द्यायची त्यांचे अध्ययन त्यांनी कसे करावे, त्या अध्ययनकृती जाणून घेण्यासाठी प्रश्न क्र. १३ मध्येच योजना केली होती. प्रश्नापुढे काही पर्याय दिले होते. स्वयंअध्ययनासाठी कृती देत असाल त्याची नोंद करावी. दिलेल्या पर्यायाव्यतिरिक्त अन्य कृती देत असाल तर नोंद करावयास सांगितले होते. त्यानुसार जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२२ मध्ये केलेले आहे.

सारणी क्र. ४.२२

स्वयंअध्ययन पध्दतीने शिकण्याच्या कृतींबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| प्रकरण क्रमांक | घरी वाचन येणे सुचविणारी अध्यापक संख्या | वर्गात त्या भागावर प्रश्न विचारणे सुचविणारी अध्यापक संख्या | लेखन देणे सुचविणारी अध्यापक संख्या |
|---|---|---|---|
| ३ | १५ | १५ | - |
| ४ | ९ | ५ | ४ |
| ५ | १९ | १० | ९ |
| ११ | २० | २५ | ५ |
| १२ | २० | २५ | ५ |

वरील सारणी क्रमांक ४.२२ वरून असे निदर्शनास येते की, प्रकरण क्र. ३ साठी ६० टक्के अध्यापकांनी घरी वाचून येणे व त्यावर वर्गात प्रश्न विचारणे या कृती सुचविल्या आहेत. प्रकरण क्र. ४ साठी ३६ टक्के अध्यापक

घरी वाचून येणे, २० टक्के अध्यापकांनी वर्गात त्यावर प्रश्न विचारणे तर १६ टक्के अध्यापकांनी लेखन देणे या कृती वापरल्या आहेत.

प्रकरण क्र. ५ साठी ७६ टक्के अध्यापकांनी घरी वाचून येणे, ४० टक्के अध्यापकांनी त्यावर प्रश्न विचारणे व ३६ टक्के अध्यापकांनी त्या भागावर लेखन देणे इत्यादी कृती नमूद केल्या आहेत. प्रश्नावलीत सुचविलेल्या कृतीशिवाय स्वयंअध्ययनासाठी अन्य कृती देत असाल तर नोंद करा असे सुचविले असता एकाही अध्यापकाने अन्य कृतींची नोंद केलेली नाही.

### ४.१७ ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणाबाबत इतिहास अध्यापकांचा दृष्टिकोन :

एखाद्या घटनेचे, प्रसंगाचे पुरेपूर आकलन होण्यासाठी ऐतिहासिक संबोध स्पष्ट होणे आवश्यक आहे. संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापकांनी विविध पध्दतींचा वापर करणे आवश्यक आहे.

#### अ) ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापक वापरीत असलेल्या पध्दतीबाबतचे विश्लेषण

संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापक कोणकोणत्या पध्दतींचा वापर करतात हे जाणून घेण्याच्या इच्छेने प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १४ ची योजना केली होती. त्यात इ. ९ वीच्या पाठ्यपुस्तकातील काही महत्वाचे संबोध दिले होते व त्या संबोधाच्या स्पष्टीकरणासाठीच्या काही पध्दती पुढे दिल्या होत्या त्यातील वापरीत असलेल्या पध्दतींच्या रकान्यात नोंद करा असे सुचित केले होते. त्यानुसार जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२३ मध्ये केलेले आहे.

प्रस्तुत आलेख संदर्भित सारणीच्या जवळ यावा
या उद्देशाने विरुध्द बाजूस ठेवला आहे.

सारणी क्र. ४.२३

ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी इतिहास अध्यापक वापरीत असलेल्या पध्दतींचे विश्लेषण

| संबोध क्रमांक | कथन पध्दतीने संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या | आधार पध्दतीने संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या | चर्चा पध्दतीने संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या | स्वाध्याय पध्दतीने संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २४ | ७ | ८ | २ |
| २ | २० | ७ | ११ | ४ |
| ३ | १६ | ४ | १४ | ५ |
| ४ | २० | ५ | १२ | २ |
| ५ | २२ | ६ | १२ | २ |
| ६ | २० | ७ | १४ | ५ |
| ७ | १९ | ७ | ११ | २ |
| ८ | २२ | १० | ८ | ३ |
| ९ | २२ | ४ | ११ | २ |
| १० | २० | ७ | १३ | १ |
| ११ | २० | ११ | १२ | २ |
| १२ | २१ | ६ | ९ | ४ |
| १३ | २१ | १२ | १२ | २ |
| १४ | १८ | ११ | १२ | २ |
| १५ | १९ | ७ | २ | १ |
| एकूण अध्यापक संख्या | ३०४ | १११ | १६१ | ३९ |
| सरासरी अध्यापक संख्या | २० | ७ | ११ | ३ |

वरील सारणी क्र. ४.२३ वरून असे निदर्शनास येते की, एकूण २५ अध्यापकांपैकी सरासरी २० अध्यापक ऐतिहासिक संबोधाचे स्पष्टीकरण करण्यासाठी कथन पध्दतीचा वापर करतात. म्हणजेच संबोध स्पष्टीकरणासाठी

कथन पध्दतीचा ८० टक्के अध्यापक वापरत करतात. ७ अध्यापक ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी आधार पध्दतीचा वापर करतात. सरासरीने ११ अध्यापक चर्चा पध्दतीचा वापर करतात तर केवळ ३ अध्यापक स्वाध्याय पध्दतीचा संबोध स्पष्टीकरणासाठी वापर करतात. संबोध स्पष्टीकरण करण्यासाठी ज्या पध्दती अध्यापकांनी वापरल्याची नोंद केली होती त्याच पध्दतींचा सारणीत उल्लेख केला आहे.

ब) ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापकांनी वापरलेल्या शैक्षणिक साधनांबाबतचे विश्लेषण :

शैक्षणिक साहित्याचा वापर हा अध्यापनाचा आत्मा मानला जातो. संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापक वापरीत असलेल्या शैक्षणिक साहित्याचा आढावा घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १४ मध्येच योजना केली होती. त्याला अनुसरून जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र.४.२४ मध्ये केलेले आहे.

## सारणी क्र. ४.२४

### ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणातील शैक्षणिक साधनांच्या वापराबाबतचे विश्लेषण

| संबोध क्रमांक | फळ्याच्या साहाय्याने संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या | चित्रांद्वारे संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या | आकृतीद्वारे संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या | नकाशाद्वारे संबोध स्पष्ट करणारी अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २० | - | - | १८ |
| २ | २५ | - | - | १० |
| ३ | १७ | १० | १० | - |
| ४ | १८ | - | - | - |
| ५ | २० | - | - | १५ |
| ६ | २० | - | - | १५ |
| ७ | २० | १५ | - | - |
| ८ | १० | १० | - | १५ |
| ९ | २० | - | - | - |
| १० | २० | १० | १० | - |
| ११ | १५ | - | १० | - |
| १२ | १५ | ५ | - | - |
| १३ | १५ | १० | - | - |
| १४ | १० | १५ | - | १० |
| १५ | १० | १० | - | १० |
| एकूण अध्यापक संख्या | २५० | ८५ | ३० | ९३ |
| सरासरी अध्यापक संख्या | १७ | ६ | २ | ६ |

वरील सारणी क्र. ४.२४ वरून असे निदर्शनास येते की, इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमातील काही महत्वाच्या दिलेल्या संबोधाचे स्पष्टीकरण करण्यासाठी एकूण २५ अध्यापकांपैकी सरासरीने १७ अध्यापक फळ्याचा वापर करतात म्हणजेच ६४ टक्के अध्यापक फळ्याचा वापर करून संबोधाचे स्पष्टीकरण करतात. त्याचप्रमाणे संबोध स्पष्टीकरण करण्यासाठी चित्रांचा वापर करणारी सरासरी अध्यापक संख्या ६ आहे. आकृतीचा वापर करणारी सरासरी अध्यापक संख्या २ आहे व नकाशांचा वापर करणारी अध्यापक संख्या ६ आहे. दिलेल्या साधनांपैकी ज्या साधनांचा वापर संबोध स्पष्टीकरण करण्यासाठी अध्यापकांनी केला आहे त्याच साधनांचे वर्गीकरण सारणीत केले आहे. दिलेल्या साधनां- शिवाय अन्य शैक्षणिक साधनांचा वापर करीत असाल तर नोंद करा असे सूचित करूनही एकाही अध्यापकाने तशी नोंद केलेली नाही.

क) संबोध स्पष्टीकरणासाठीच्या शैक्षणिक साहित्याची शाळेतील उपलब्धता :

ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी आवश्यक ते शैक्षणिक साहित्य शाळांतून उपलब्ध आहे काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १५ ची योजना केली होती. जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२५ मध्ये केलेले आहे.

सारणी क्र.४.२५

संबोध स्पष्टीकरणासाठीच्या शैक्षणिक साहित्याच्या शाळेतील उपलब्धतेबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| | |
|---|---|
| १) संबोध स्पष्टीकरणासाठीची आवश्यक ती शैक्षणिक साधने शाळेत उपलब्ध आहेत असे म्हणणारी अध्यापक संख्या | १२ |
| २) संबोध स्पष्टीकरणासाठीची आवश्यक ती शैक्षणिक साधने शाळेत उपलब्ध नाहीत असे म्हणणारी अध्यापक संख्या | १३ |
| एकूण अध्यापक संख्या | २५ |

वरील सारणी क्र. ४.२५ वरून असे निदर्शनास येते की, ४८ टक्के अध्यापकांच्या मते संबोध स्पष्टीकरण करण्यासाठी आवश्यक ती शैक्षणिक साधने शाळांमध्ये उपलब्ध आहेत व ५२ टक्के अध्यापकांच्या मते संबोध स्पष्टीकरणासाठी आवश्यक ती शैक्षणिक साधने शाळांतून उपलब्ध नाहीत.

ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी उपयुक्त ठरणाऱ्या शैक्षणिक साधनांपैकी शाळांमधून कोणकोणती साधने नाहीत हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १६ ची योजना केली होती. त्याला अनुसरून जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२६ मध्ये केलेले आहे.

सारणी क्र. ४.२६

ऐतिहासिक संबोध स्पष्ट करण्यासाठी शाळेत उपलब्ध नसलेल्या शैक्षणिक साधनांचे विश्लेषण

| अनु. | शैक्षणिक साधने | संबंधित साधने शाळेत उपलब्ध नाहीत असे म्हणणारी अध्यापक संख्या |
|---|---|---|
| १. | चित्रे | १० |
| २. | आकृती | ७ |
| ३. | नकाशे | १० |
| ४. | नमुने | २० |
| ५. | कालपट | २५ |
| ६. | प्रोजेक्टर | २३ |
| ७. | तक्ते | १० |
| ८. | संदर्भ ग्रंथ | ७ |

वरील सारणी क्र. ४.२६ वरून असे निदर्शनास येते की, एकूण २५ अध्यापकांपैकी १० अध्यापक म्हणजे ४० टक्के अध्यापकांच्या मते शाळेतून संबोध स्पष्टीकरणासाठी आवश्यक ती चित्रे, नकाशे, व तक्ते नाहीत. संबोध स्पष्टीकरणासाठी आवश्यक अशा आकृत्या व संदर्भ ग्रंथ शाळेत उपलब्ध नाहीत असे म्हणणारी अध्यापक संख्या ७ आहे. संबोध स्पष्टीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांपैकी नमुने शाळेत उपलब्ध नाहीत असे २० अध्यापकांनी नमूद केले आहे. कालपट नाहीत असे २५ अध्यापकांनी व प्रोजेक्टर नाही असे २३ अध्यापकांनी नमूद केले आहे.

शाळातून अत्यावश्यक अशी शैक्षणिक साधने नसल्याने अध्यापक त्यांचा वापर करीत नाहीत. त्यामुळे संबोधाचे स्पष्टीकरण व्यवस्थित केले जात नाही. ऐतिहासिक घटनांचे व्यवस्थित आकलन होत नाही. परिणामी इतिहास विषय क्लिष्ट वाटू लागतो. विषयाबाबत अभिरुची निर्माण होण्याऐवजी रुक्षता वाटू लागते.

४.१८ इ. ९ वीचा इतिहासाचा अभ्यासक्रम व मूल्यशिक्षण :

इतिहास विषयाच्या अध्यापनाची जी अनेक सामान्य उद्दिष्टे आहेत त्यातील चारित्र्यसंपन्न नागरिक बनविणे हे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. इतिहास विषयातून उदाहरणे देऊन धडे दिले जातात. थोर व्यक्तींच्या चरित्रातून त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचे महत्व स्पष्ट केले जाते. नैतिक शिक्षणाचे पाठ इतिहासातून दिले जातात. इतिहास हा मानवाच्या वृत्तीशी संबंधित विषय आहे.

आजची जगाची अवस्था लक्षात घेता कधी नव्हे इतकी आंतरराष्ट्रीय सामंजस्य, विश्वबंधुत्व अशा मूल्यांची गरज निर्माण झाली आहे. अशी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीरित्या रुजविण्याचे महान कार्य इतिहास विषयातून केले जाते.

प्रस्तुत पाठेस संदर्भित वारणीच्या स्रोत यावा
या उद्देशाने विलम्ब बाजूने लावला आहे.

अ) इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांबाबतची इतिहास अध्यापकांची मते :

इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या प्रमाणाबाबतची इतिहास अध्यापकांची मते जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १७ ची योजना केली होती. त्याला अनुसरून जमा झालेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२७ मध्ये केलेले आहे.

सारणी क्र.४.२७

इयत्ता ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे प्रमाण दर्शविणारी अध्यापक संख्या

| मूल्ये ⟶ प्रकरण क्रमांक | वस्तुनिष्ठ भूमिका | राष्ट्र-भक्ती | निकोप राष्ट्र- | विश्व-बंधुत्व | आंतरराष्ट्रीय सामंजस्य | भावनात्मक ऐक्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ | २० | १० | १० | - | २० |
| २ | २० | १५ | १० | १० | - | १३ |
| ३ | २० | १६ | ९ | ९ | - | १५ |
| ४ | २० | - | - | ५ | १० | - |
| ५ | १५ | ५ | - | ७ | ८ | - |
| ६ | १५ | ८ | - | १७ | १५ | १५ |
| ७ | १३ | १२ | १० | - | - | १३ |
| ८ | १३ | १५ | १२ | - | - | १३ |
| ९ | १५ | २१ | १६ | - | - | १९ |
| १० | १५ | २२ | १६ | - | - | १७ |
| ११ | १३ | २१ | २० | - | ५ | १६ |
| १२ | १३ | २० | १८ | - | ३ | १५ |
| १३ | १५ | १४ | १४ | ८ | - | १३ |
| एकूण अध्यापकं संख्या | २०२ | १८९ | १३५ | ६६ | ४१ | १६९ |
| सरासरी अध्यापक संख्या | १६ | १५ | १० | ५ | ३ | १३ |

वरील सारणी क्र. ४.२७ वरून असे निदर्शनास येते की, इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात वस्तुनिष्ठ भूमिका हे मूल्य अंतर्भूत आहे असे सरासरी १६ अध्यापकांनी नमूद केले आहे. म्हणजेच ६४ टक्के अध्यापकांच्या मते इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात वस्तुनिष्ठ भूमिका हे मूल्य अंतर्भूत आहे. राष्ट्रभक्ती हे मूल्य अंतर्भूत आहे असे दर्शविणारी अध्यापक संख्या १५ आहे. भावनात्मक ऐक्य हे मूल्य अंतर्भूत आहे असे दर्शविणारी अध्यापक संख्या १३ आहे. विश्वबंधुत्व व आंतरराष्ट्रीय सामंजस्य या मूल्यांचा अभ्यासक्रमातील अंतर्भाव दर्शविणारी अध्यापक संख्या कमी आहे.

ब) निर्धारित मूल्यांव्यतिरिक्त अन्य मूल्यांबाबतची इतिहास अध्यापकांची मते :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या इ. ९ वीच्या इतिहासाच्या अध्यापन पुस्तिकेत नमूद केलेल्या मूल्यांव्यतिरिक्त अन्य मूल्ये या अभ्यासक्रमातून साध्य होऊ शकतात काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १८ ची योजना केली होती. त्याला अनुसरून आलेल्या माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ४.२८ मध्ये केलेले आहे.

## सारणी क्र.४.२८

अध्यापन पुस्तिकेत निर्धारित केलेल्या मूल्यांव्यतिरिक्त इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेल्या अन्य मूल्यांबाबतची इतिहास अध्यापकांची मते

| मूल्ये प्रकरण क्रमांक | संघभावना | त्यागवृत्ती | समता | नेतृत्व | ध्येयवाद | शास्त्रीय दृष्टीकोन | धर्मनिरपेक्षता | स्वातंत्र्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | - | ५ | - | - | - | - | ५ | - |
| २ | - | ६ | - | - | - | - | - | - |
| ३ | - | ५ | - | - | - | - | - | - |
| ४ | - | - | - | - | - | ६ | - | - |
| ५ | - | - | - | - | - | ६ | - | - |
| ६ | - | ६ | - | - | - | - | - | ६ |
| ७ | - | ६ | - | - | - | - | - | ६ |
| ८ | - | ६ | - | - | - | - | - | ६ |
| ९ | - | - | ५ | ५ | ५ | - | - | - |
| १० | - | - | ५ | ५ | ५ | - | - | - |
| ११ | - | - | ६ | ६ | - | - | - | -१० |
| १२ | - | - | ६ | ६ | - | - | - | १० |
| १३ | ५ | - | ५ | ५ | - | - | - | ८ |

वरील सारणी क्र. ४.२८ वरून असे निदर्शनास येते की, प्रकरण क्र.१ मधून समता व धर्मनिरपेक्षता या दोन मूल्यांचा अंतर्भाव होतो असे ५ अध्यापक दर्शवितात. प्रकरण क्र. २ मधून त्यागवृत्ती या मूल्याचा अंतर्भाव होतो असे दर्शविणारी अध्यापक संख्या ६ आहे. प्रकरण क्र. ३ मध्ये समता हे मूल्य अंतर्भूत आहे असे ५ अध्यापक दर्शवितात. प्रकरण क्र.४ व ५ मध्ये शास्त्रीय दृष्टिकोन या मूल्याचा अंतर्भाव झालेला आहे असे ६ अध्यापक दर्शवितात.

प्रकरण क्र. ६, ७ व ८ मध्ये त्यागवृत्ती व स्वातंत्र्य या मूल्यांचा अंतर्भाव झालेला आहे असे दर्शविणारी अध्यापक संख्या ६ आहे.

प्रकरण क्रमांक ९, १० मधून समता, नेतृत्व, ध्येयवाद या मूल्यांचा अंतर्भाव झालेला आहे असे पाच अध्यापकांनी दर्शविले आहे. प्रकरण क्र. ११ व १२ मधून त्यागवृत्ती व नेतृत्व या मूल्यांचा अंतर्भाव झाला आहे असे सहा अध्यापकांनी नमूद केले आहे व त्याच प्रकरणात स्वातंत्र्य या मूल्याचा अंतर्भाव झाला आहे असे १० अध्यापकांनी नमूद केले आहे.

प्रकरण क्र. १३ मध्ये बंधुभावना, त्यागवृत्ती व नेतृत्व या मूल्यांचा अंतर्भाव झाला आहे असे ५ अध्यापकांनी नमूद केले आहे व त्याच प्रकरणामध्ये स्वातंत्र्य या मूल्याचा अंतर्भाव झालेला आहे असे ८ अध्यापकांनी नमूद केले आहे.

## ` ब ` विभाग

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या मुलाखतीद्वारे आलेल्या माहितीचा अन्वयार्थ

प्रकरण क्रमांक चार मधील या ` ब ` विभागात संशोधकाने शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील इतिहास विशेष अध्यापन पध्दतीचे अध्यापन केलेल्या व करीत असलेल्या अधिव्याख्यात्यांच्या घेतलेल्या मुलाखतीद्वारे जमा झालेल्या माहितीचा अन्वयार्थ लावला आहे. संशोधकाने १० तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेतल्या त्यांची यादी परिशिष्ट (इ) मध्ये दिली आहे. मुलाखती घेतलेले सर्व अधिव्याख्याते एम.ए., एम.एड्. आहेत. १० अधिव्याख्यात्यांपैकी ४ अधिव्याख्याते एम.फिल. आहेत. १ अधिव्याख्याता पीएच.डी. करीत आहे. २ अधिव्याख्याते एम.फिल. करीत आहेत.

तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांकडून इ. ९वी चा इतिहासाचा अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती, शैक्षणिक साधने, ऐतिहासिक संबोध, मूल्यशिक्षण व इतिहास अध्यापकांचे प्रशिक्षण याबाबत बरीच उपयुक्त माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. मुलाखतीत तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांनी मांडलेले विचार इतिहासाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी काही कार्यनीती सुचविण्यास निश्चतच उपयुक्त ठरणार आहेत.

### तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांची मते -

१) इ. ९ वीचा अभ्यासक्रम वयोगट लक्षात घेता योग्य आहे. अभ्यासक्रमात स्वातंत्र्य, समता व लोकशाही यासाठी जगातील ज्या ज्या देशात लढे उभारले गेले त्याचा धागा पकडून विषयांशाची गुंफण केली आहे. वरील जागतिक घटनांच्या संदर्भात भारतातील स्वातंत्र्य लढयाचा

अन्वयार्थ लावावयाचा असल्याने फ्रान्स, अमेरिका, रशिया येथील क्रांत्या, इंग्लंडमधील लोकशाही, इटली, जर्मनीचे एकीकरण या घटना निवडल्या आहेत असे बहुतांशी अधिव्याख्यात्यांना वाटते पण त्यामुळे अभ्यासक्रमात सलगता ठेवता आली नाही असे ३० टक्के अधिव्याख्यात्यांना वाटते.

२) जागतिक महत्वाच्या घटनांचा अभ्यासक्रमात समावेश केल्याने अभ्यासक्रम व्यापक बनला आहे व त्यामुळे इतिहास अध्यापकांची जबाबदारी वाढली आहे असे ७० टक्के तज्ञांना वाटते.

३) इतिहासाचे अध्यापक अध्यापन करताना पाठयपुस्तक पध्दती व कथन पध्दतीच वापरतात. युनिटप्रमाणे पध्दती वापरीत नाहीत असे १०० टक्के तज्ञांनी सूचित केले आहे. इतिहासाचे अध्यापन परिणामकारक व प्रभावीरित्या होत नाही त्यात जीवंतपणा नसतो असे बहुतांशी तज्ञांचे मत आहे.

४) इतिहास विषयातील शैक्षणिक साहित्याच्या उपलब्धतेची अडचण ३० टक्के तज्ञांनी मान्य केली तर ७० टक्के तज्ञांच्या मते शाळेत उपलब्ध असलेल्या शैक्षणिक साहित्याचा वापर इतिहास अध्यापक करीत नाहीत.

५) ऐतिहासिक संबोध इतिहास अध्यापकांकडून स्पष्ट केले जात नाहीत असे ९० टक्के तज्ञांना वाटते.

६) इतिहास विषय हा मूल्यशिक्षण देण्यासाठीचा एक क्रमांकाचा महत्वपूर्ण विषय आहे असे १०० टक्के तज्ञ मत दर्शवितात. इतिहासातून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी मूल्ये रुजविण्यासाठी इतिहास अध्यापक कमी पडतात असे बहुसंख्य तज्ञांचे मत आहे.

७) प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दैनंदिन अध्यापनात इतिहास अध्यापक बी.एड्.च्या पध्दतीप्रमाणे अध्यापन करीत नाहीत. त्या पध्दतीनुसार

अध्यापन केल्याने अभ्यासक्रम निर्धारित वेळेत पूर्ण होत नाही ही सबब तज्ज्ञांना मान्य नाही. वेगवेगळ्या पध्दतींचा वापर करून अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करता येतो असे १०० टक्के तज्ज्ञांना वाटते.

८) पदवी पातळीवर इतिहास मुख्य विषय नसेल तर त्यांना इतिहास अध्यापन ही विशेष पध्दती देऊ नये असे १०० टक्के तज्ज्ञांचे मत आहे. पध्दती दिली तर विषयज्ञान कमी असल्याचा अध्यापनावर परिणाम होतो.

तज्ज्ञांच्या मते इ. ९ वीचा इतिहासाचा अभ्यासक्रम जागतिक घटनांशी संबंधित असल्याने इतिहास अध्यापकांनी घटनांमधील अन्वयार्थ स्पष्ट केला पाहिजे. इतिहासाच्या पाठयपुस्तकाची रचना विद्यार्थी स्वत: शिकतील अशा पध्दतीने केली पाहिजे. इतिहास अध्यापकांनी युनिटप्रमाणे वेगवेगळी पध्दती वापरली पाहिजे. इतिहास अध्यापकांनी उपलब्ध शैक्षणिक साहित्याचा वापर केला पाहिजे. अध्यापकाने मनात आणले तर विद्यार्थ्यांच्या, कलाशिक्षकांच्या मदतीने कमी खर्चात शैक्षणिक साधने ते तयार करू शकतात. त्यांचे जतन करून दीर्घकाळ वापर करू शकतात.

ऐतिहासिक संबंध स्पष्टीकरणासाठी अध्यापकांनी विविध पध्दती वापराव्यात. शैक्षणिक साधने वापरावीत. उदाहरणे, दाखले, यांचा वापर करावा. संबंधांचे स्पष्टीकरण व्यवस्थित झाले तरच पुढील ऐतिहासिक घटनांचे चांगले आकलन होते.

मूल्यशिक्षण रुजविण्यासाठी अध्यापकच मूल्याधिष्ठित असला पाहिजे. अध्यापकाने आपल्या वर्तनातून विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवावेत आणि अध्यापन करीत असताना विषयज्ञानाबरोबरच मूल्यांवर भर दिला जावा.

बी.एड्.च्या पध्दतीनुसार अध्यापन केल्याने अध्यापकाला अगोदर नियोजन करावे लागते. विषयांतरास संधी मिळत नाही. वर्गात अध्यापक व विद्यार्थी यांच्यात अधिक आंतरक्रिया होतात. ओढून ताणून पध्दती आणावी लागू नये तर पध्दती इतिहास अध्यापकांच्या अंगवळणी पडली पाहिजे. पदवी पातळीवर इतिहासाचे अध्ययन केलेल्यांनाच बी.एड्.ला इतिहास विशेष अध्यापन पध्दती द्यावी. विषयज्ञान असेल व योग्य पध्दतीचा वापर केला तर अध्यापन प्रभावीरित्या करता येते.

इतिहासाचे अध्यापन प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी अध्यापकाचे विषयज्ञानावर प्रभुत्व हवे, योग्य अध्यापन पध्दतीची निवड करावी, अध्यापन कार्यनितींचा अवलंब करावा, सद्य:स्थितीशी समवाय साधावा, आधार, दाखले, उदाहरणे द्यावीत, प्रसंगानुसार नाट्टीकरण करावे. अंत:करणाने प्रसंगात स्वरूप होऊन, जीव ओतून अध्यापन करावे.